। लातूर । वर्ष ३४ वे । अंक २२८ वा । बुधवार, दिनांक ०३ डिसेंबर २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १ रू. RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# शेतकऱ्यांच्या मदतीचा प्रस्ताव केंद्राला पाठवला की नाही?: केंद्रीय कृषिमंत्री म्हणतात -नाही; मुख्यमंत्री म्हणतात - अगोदरच पाठवला

***मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या मदतीचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी संसदेत महाराष्ट्र सरकारकडून मदतीच्या मागणीसाठी अद्याप कोणताही अहवाल मिळाला नसल्याचे सांगितले आहे. त्यावर मुख्यमंत्र्यांनी यासंबंधीचा अहवाल यापूर्वीच पाठवल्याचा दावा केला आहे. यामुळे केंद्राला मदतीचा अहवाल पाठवला की नाही? याविषयी संभ्रमावस्था निर्माण झाली आहे.*




देवेंद्र फडणवीस या प्रकरणी बुधवारी पत्रकारांशी स्थिती स्पष्ट करताना म्हणाले, संसदेतील प्रश्नोत्तरांची प्रक्रिया ही ३५ दिवस आधीच्या माहितीवर आधारित असते. त्यामुळे मंत्र्यांचे उत्तर त्यावेळच्या स्थितीनुसार असू शकते. प्रत्यक्षात राज्य सरकारने आपला अहवाल यापूर्वीच केंद्राकडे सुपूर्द केला आहे. केंद्रीय पथकाने दोन वेळा राज्याचा दौरा करून पाहणीही केली आहे. त्यांचा अहवालही सादर झाला आहे, असे फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, संसदेत जी प्रश्नोत्तरे असतात ती ३५ दिवस आधीची असतात. आपला अहवाल केंद्र सरकारकडे गेला आहे. केंद्र सरकारने त्या अनुषंगाने आपल्याकडे दोन वेळेस टीम पाठवली सुद्धा, त्या टीमने त्या अनुषंगाने आपला अहवाल सादर सुद्धा केला आहे. मात्र 'इन्फ्रास्ट्रकचररचे जे नुकसान झाले त्यासंदर्भात टीम नंतर येईल. आधी कृषीची टीम येऊन जाईल. त्यामुळे इन्फ्रास्ट्रकचरच्या संदर्भात आपल्याला जी मदत द्यायची आहे त्या संदर्भातील टीम पुढच्या आठवड्यात येणं अपेक्षित आहे. ती टीम आल्यानंतर त्यांचा अहवाल जाईल. पण कृषी संदर्भातील अहवाल गेलेला आहे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी राज्य सरकारने केंद्र सरकारला प्रस्ताव पाठवला आहे.त्यानंतर केंद्रीय पथक येते आणि ते अंतिम करते. शेवटी लोकसभेच्या उत्तरामध्ये हेच आले असेल की अंतिम मदतीचा गोषवारा या नियोजित ठिकाणी गेला नसेल. राज्य आणि केंद्र सरकारचा ताळमेळ अजून बसवून अंतिम मदतीला गेला नसेल.आज राज्य आणि केंद्र सरकारची पाहणी झाली आहे. त्यामुळे आता मदतीसंदर्भात अंतिम प्रस्ताव जाईल.

सप्टेंबर २०२५ मध्ये राज्यातील विविध भागांमध्ये झालेल्या अतिवृष्टीने लाखो हेक्टरवरील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना वेळेत दिलासा देण्यासाठी राज्य सरकारकडून केंद्राला औपचारिक प्रस्ताव पाठवणे अत्यावश्यक आहे, असे केंद्रीय मंत्र्यांनी नमूद केले. ३ ते ५ नोव्हेंबर २०२५ दरम्यान केंद्रीय पथकाने पूरग्रस्त भागांची पाहणी केली, परंतु पाहणी पूर्ण झाल्यानंतरही राज्य सरकारकडून अंतिम प्रस्ताव पाठवलेला नाही. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी स्पष्ट केले की, NDRF मधून मदत देण्याचा निर्णय हा या प्रस्तावावर अवलंबून असेल. राज्य सरकारने स्वतःच्या आपत्ती निवारण निधीतून आधीच ४,१७६ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केले आहेत. तसेच राज्याच्या निधीत सध्या १,६१३ कोटी ५२ लाख रुपये शिल्लक आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याशी भेटून केंद्राकडे जास्तीत जास्त मदतीची मागणी केली होती.

## राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन ८ ते १४ डिसेंबर कालावधीत नागपूर येथे होणार



### विधानसभा आणि विधानपरिषद विधिमंडळ कामकाज सल्लागार समिती बैठकीत निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सोमवार दि. ८ ते रविवार दि. १४ डिसेंबर २०२५ या कालावधीत नागपूरमध्ये होणार आहे. दि. १३ डिसेंबर शनिवार आणि दि. १४ डिसेंबर रविवार शासकीय सुट्टीच्या दिवशीही दोन्ही सभागृहाचे कामकाज घेण्याचा निर्णय विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

विधानभवन येथे विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.बैठकीला विधान परिषद सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानपरिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, उच्च व तंत्र शिक्षण व संसदीय कार्यमंत्री चंद्रकांतदादा पाटील, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, विधानसभा सदस्य सर्वश्री सुधीर मुनगंटीवार,दीपक केसरकर, जितेंद्र आव्हाड, भास्कर जाधव, सुनील प्रभू,अमीन पटेल विधानपरिषद सदस्य अनिल परब, प्रसाद लाड, प्रवीण दरेकर, विक्रम काळे, सतेज पाटील, विधिमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

'भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल' या ऐतिहासिक पर्वानिमित्त दिनांक २६ मार्च २०२५ रोजी विधानसभेत भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल' या विषयावर सभागृहात चर्चा झाली होती. या वेळी झालेल्या चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या भाषणाचे पुस्तक स्वरूपातील संकलन महाराष्ट्र विधिमंडळ वि.स. पांगे संसदीय प्रशिक्षण केंद्राच्या पुढाकारातून करण्यात आले आहे. हा पुस्तक प्रकाशन सोहळा मंगळवार दिनांक ९ डिसेंबर २०२५ रोजी राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात येणार आहे असे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी बैठकीत सांगितले.

## जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघामध्ये ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्गाचा प्रवेश सुरु

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संचालनालयाच्या,लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संचलित ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्गाची प्रवेश प्रक्रिया हुतात्मा स्मारक,लातूर येथे दि.१ डिसेंबर २०२५ पासून सकाळी ११.३० ते सायंकाळी ५ या वेळात सुरु झाली असून,ती २० डिसेंबरपर्यंत चालणार आहे.इच्छुकांनी लवकरात लवकर प्रवेश अर्ज भरावा असे आवाहन जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर कापसे आणि कार्यवाह राम मेकले यांनी केले आहे.

शाळा,महाविद्यालये,आश्रमशाळा,न्यायालय,आरोग्य विभाग ग्रंथालय यासह विविध क्षेत्रात ग्रंथपालन प्रमाणपत्र उत्तीर्ण उमेदवारांना नोकरीची संधी आहे.ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्ग प्रवेशासाठी किमान बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे,प्रवेशासाठी बारावीचे गुणपत्रक,सनद,टी.सी.अनुभव असेल तर अनुभव प्रमाणपत्र,आधारकार्ड, तीन पासपोर्ट फोटो अर्जासोबत द्यावा,दि.१ जानेवारी ते ३० जून हा वर्गाचा कालावधी असून,दर शनिवार आणि रविवारी सकाळी ९ ते दुपारी २ या वेळात वर्ग असतील, हे वर्ग नियमित होणार असून, उपस्थिती आवश्यक आहे.शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालय,शाळा,महाविद्यालयातील नियुक्ती असणाऱ्यास प्रथम प्राधान्य राहील. तरी इच्छुकांनी अधिक माहितीसाठी मो. नं.७७०९९७०७७५,८८५५००८०५७ वर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात 'ए आय विथ पायथॉन' विषयावरील वीस दिवसीय प्रशिक्षण संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील बीसीए तृतीय वर्ष तसेच एमसीए प्रथम वर्षातील एकूण १२५ विद्यार्थ्यांसाठी 'ए आय विथ पायथॉन' या विषयावर वीस दिवसीय (१२० तासांचे) प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. या उपक्रमाचे आयोजन करिअर गाईडन्स अँड प्लेसमेंट सेलच्या पुढाकाराने फ्युएल कंपनीच्या सहकार्याने करण्यात आले आहे. या कार्यशाळेसाठी फ्युएल कंपनीचे शुभम सोनवणे हे मार्गदर्शक म्हणून लाभले आहेत.

या प्रशिक्षणा दरम्यान विद्यार्थ्यांसाठी विविध ॲक्टिव्हिटीज, स्किल डेव्हलपमेंट सत्रे, तसेच विद्यार्थ्यांच्या तयारीसाठी मॉक इंटरव्यूचे आयोजन करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने होते. यावेळी मंचावर बीसीए विभाग प्रमुख प्रा. शशिकांत स्वामी, बीबीए विभाग प्रमुख प्रा. डॉ. वैशाली सातपुते, तसेच ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. दगडू शेख उपस्थित होते. कार्यक्रम सुरळीत पार पडण्यासाठी बीसीए विभागातील प्रा. प्रसाद पाटील,



प्रा. गीतांजली जोशी, आणि प्रा. ज्योती महावरकर यांनी सहकार्य केले. दयानंद वाणिज्य महाविद्यालय विद्यार्थ्यांना व्यावसायिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी नेहमीच अशा उपक्रमांचे आयोजन करत असते.

## रेणापूरच्या ९७ गावात कुष्ठरोग शोधमोहिमेत १ बाधित

**रेणापूर/प्रतिनिधी :** तालुक्यातील पाच प्राथमीक आरोग्य केंद्रांतर्गत २१ उपकेंद्राच्या माध्यमातून तालूका आरोग्य अधिकारी डॉ श्रीधर रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीत रेणापूर तालुक्यातील ९७ गावातील २१४ आरोग्य विभागाच्या टीमने २६ हजार १३ घराला भेटी देऊन १ लाख २८ हजार ४८९ लोकांची कुष्ठरोग शोधमोहिमेत तपासणी केली.आसून १ रुग्णांचे निदान झाले असून त्याच्यावर औषध उपचार सुरु असल्याची माहीती तालूका आरोग्य अधिकारी डॉ श्रीधर रेड्डी यांनी दिली. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्याने २०२७ पर्यंत शुन्य कुष्ठरोग प्रसाराचे ध्येय निश्चित केले आहे.त्यानुसार आरोग्य विभागाच्या वतीने रेणापूर तालूका आरोग्य अधिकारी डॉ श्रीधर रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीत कुष्ठरोग शोध मोहीम राबवण्यात आली. तालुक्यातील पानगाव, खरोळा, कारेपुर, पोहरेगाव,

बिटरगाव या पाच प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येणाऱ्या २१ आरोग्य उपकेंद्रात आरोग्य कर्मचारी २१४ जणांच्या टीमने तालुक्यातील २६ हजार १३ घराला भेटी देऊन १ लाख २८ हजार ४८९ नागरिकांची तपासणी करण्यात आली.या मोहीम मध्ये ११५४ संशयित रुग्ण आढळून आले असून १ रुग्णांचे निदान झाल्याने त्याला औषध उपचार सुरु आहेत.

ग्रामस्थांच्या त्वचेवरचे चट्टे, स्पर्शज्ञान तपासात त्यांच्यात जनजागृती करत आहे. ग्रामस्थांना कुष्ठरोग लक्षणे,बाधीत रुग्ण तसेच त्यावर उपचार,त्याची सचित्र माहीती असणारी पत्रकेही वाटप करण्यात आले.नागरीकांनी न घाबरता पुढे येऊन लक्षणे जाणवत आसल्यास संपर्क साधावा.

कुष्ठरोगाची सुरुवात एक किंवा अनेक डागांनी होऊ शकते. शरीरावरील त्वचेच्या रंगापेक्षा फिक्कट किंवा लालसर रंगाचा,सपाट किंवा मोजकीच संख्या असलेल्या डागावर बऱ्याचदा बधिरता,सुन्नपणा व संवेदनांचा अभाव आसतो.हळूहळू मंद गतीने,आकाराने वा संख्येने वाढत जाणाऱ्या,पसरणाऱ्या,बऱ्याच दिवसांपासूनच्या डागाकडे दुर्लक्ष करु नये, असे असल्यास लागलीच डॉक्टरांना भेटून उपचार घेण्याचे आवाहनही आरोग्य विभागाने केले आहे.

ग्रामीण भागात कुष्ठरोगासंदर्भात लोकांच्या मनात अजूनही नाहक भिती आणि गैरसमज पसरलेले असून सर्व प्रथम आम्ही ती भिती गैरसमज दुर करत ग्रामस्थांना तो अनूवंशीक नाही,तो कुष्ठजंतू मुळे होणारा साधाच रोग आहे. सर्वसाधारणपणे आपल्यापैकी ९८ टक्के व्यक्तीमध्ये जनसामान्यात कुष्ठरोग विरुद्ध लढण्याची उत्तम नैसर्गिक रोगप्रतिकारक शक्ती असल्याने कुष्ठरोग होत नाही,मात्र कुष्ठ रोगाच्या जंतूंनी आपल्या शरीरात प्रवेश केल्यानंतर कुष्ठरोगाबद्दलची रोगप्रतिकारक शक्ती कमी पडत असेल तर ३ ते ५ वर्षानंतर शरीरावर कुठेही त्या रोगाची लक्षणे दिसू लागतात.

## फडणवीस– संजय राऊत भेट, तब्बल २० मिनिटे चर्चा

**मुंबई/प्रतिनिधी :** राजेश नार्वेकर यांच्या मुलाच्या विवाह समारंभात आज एक आगळीवेगळी राजकीय भेट पाहायला मिळाली. FDA आयुक्त राजेश नार्वेकर हे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते संजय राऊत यांचे व्याही असल्याने या सोहळ्यात विविध राजकीय मान्यवर हजर होते. त्याचदरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि संजय राऊत यांची काही काळासाठी समोरासमोर भेट झाली.

माहितीनुसार, दोघांमध्ये सुमारे २० मिनिटे चर्चा झाली. गेल्या काही दिवसांपासून तब्येत ठीक नसल्याने राजकीय कार्यक्रमांपासून दूर राहिलेल्या संजय राऊत यांच्या प्रकृतीची विचारपूस फडणवीस यांनी या भेटीत केली. राऊत यांनीही स्वतःची तब्येत आणि चालू उपचारांविषयी थोडक्यात माहिती दिल्याचे कळते.

ही भेट पूर्णपणे खाजगी कार्यक्रमाच्या अनुषंगाने झाली असली तरी राजकीय वर्तुळात या भेटीची चर्चा रंगू लागली आहे. राज्यातील राजकीय समीकरणे गुंतागुंतीची असताना वेगवेगळ्या पक्षांचे दोन नेते एका कार्यक्रमात पाहायला मिळाल्याने विविध तर्क–वितर्कांना ऊत आला आहे. राऊत गेल्या काही दिवसांपासून आरोग्याच्या कारणामुळे सार्वजनिक जीवनात कमी दिसत होते. फडणवीसांनी व्यक्तिगत पातळीवर त्यांच्या तब्येतीची चौकशी केली आहे.

## कुर्जबुज

२१ डिसेंबरला...

-डॉ. संजय जमदाडे



काही नगरपरिषद नगरपंचायत निवडणूक २0 डिसेंबरला मतदान सुधारित वेळापत्रक जाहीर...

## चिमटा दयाचा



न.प.च्या निवडणुकीत वाढलेल्या मतदानामुळे उमेदवारांची धाकधूक वाढली आहे ! आश्चर्यकारक निकालाची शक्यता वर्तवली जात आहे !!

# निवडणूक आयोगाची ही कृती जनतेच्या मतदान अधिकारावर गदा आणणारी : काँग्रेस जिल्हाध्यक्ष अभय साळुंके

**निलंगा/अयुब बागवान :** नगरपरिषद निवडणुकीच्या मतदानाला १२-१४ तास शिल्लक असताना लातूर जिल्ह्यातील निलंगा नगरपरिषद निवडणुकीला स्थगिती देण्याचा निर्णय अनाकलनीय आणि धक्कादायक आहे. निवडणूक आयोगाची ही कृती जनतेच्या मतदान अधिकारावर गदा आणणारी आणि लोकशाहीविरोधी आहे. महाराष्ट्र राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मागच्या नऊ ते दहा वर्षापासून झालेल्या नाहीत, राज्यातील सत्ताधारी मंडळींना प्रशासनाच्या माध्यमातून एकाधिकारशाही गाजवता यावी म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुका याना त्याकारणाने लांबवण्याचा प्रयत्न होतो आहे. कोणत्याही परिस्थितीत दर पाच वर्षांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक घेण्यात याव्यात असा पंचायतराज कायदा सांगतो, मात्र तांत्रिक कारणावरून या निवडणुका पुढे जातील याची व्यवस्था राज्यातील सत्ताधारी मंडळीकडूनच होत आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आता कुठे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केल्या परंतु, त्या सुरळीत पार



पाडणार नाहीत याची व्यवस्था या आयोग मार्फतच केली जात आहे.

नगरपरिषद आणि नगरपालिका ताब्यात घेण्यासाठी साम, दाम, दंड या आयुधांचा सर्रास वापर केल्याचे सध्या राज्यभरातील वातावरणावरून दिसून येत आहे, ज्या ठिकाणी काहीही करून निवडणूक जिंकताच येत नाही असे लक्षात आले तेथील निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत, निवडणूक आयोग आणि सत्ताधारी मंडळीची ही कृती लोकशाही विरोधी आहे असा विचार व्यक्त केला आहे.

काही मंडळींची ही दडपशाही जास्त काळ जनता सहन करणार नाही. त्याचबरोबर राज्य निवडणूक आयोगाच्या अनागोंदी कारभारामुळे नागरिकांना वेठीस धरण्याचे काम चालू आहे. निवडणुकीत उभारलेल्या उमेदवारावर या निर्णयामुळे अन्याय झाला आहे. हे कारण सांगत काँग्रेस जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी निलंगा बंदची हाक दिली आहे. मंगळवारी शहरात रॅली काढत व्यापाऱ्यांना बंदचे आवाहन करण्यात आले. शहरातील मुख्य बाजारपेठ बंद होती. तर महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या बसेस चालू होत्या.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## पाकिस्ताची पुन्हा, घुसखोरीची शक्यता

अतिरेक्याच्या जीवावर पाकिस्तानची मगरुरी चालूच आहे. एक ना एक दिवस हेच अतिरेकी जेंव्हा पाकिस्तानचा खातमा करतील त्यावेळी धार्मिकतेच्या आडून काम करणाऱ्यांचे डोळे उघडतील.सध्याला भारत जपून पावले उचलत आहे. अनेकदा विचार करीत आहेत. भारताला हिंसा नको तर शांतता हवी आहे, याचाच फायदा पाकिस्तान उचलत आहे. आता तर जम्मू व देशाच्या सुरक्षतेशी निगडित एक धक्कादायक खुलासा समोर आला आहे. भारतीय सीमा आणि आंतरराष्ट्रीय सीमेवर पाकिस्तानकडून घुसखोरीचे प्रयत्न बऱ्याच प्रमाणात कमी झाले परंतु धोका कित्येक पटीने वाढला आहे कारण पाकिस्तानने बॉर्डरवर लॉन्च पॅड आणि टेरर कॅम्प पुन्हा एक्टिव्ह केले आहेत, असा दावा काश्मीर फ्रंटियरचे आयजी अशोक यादव यांनी केला. आयजी अशोक यादव म्हणाले की, आता एलओसीवर ६९ लॉन्चिंग पॅड एक्टिव्ह आहेत. ज्याठिकाणी जवळपास १००-१२० दहशतवादी घुसखोरी करण्याची प्रतिक्षा करत आहेत. आमच्या इंटेलिजेंस युनिटने सर्व ६९ एक्टिव्ह लॉन्चिंग पॅडवर करडी नजर ठेवली आहे. जम्मू काश्मीरमध्ये दहशतवादविरोधी ऑपरेशन सिंदूर अजूनही जारी आहे. बॉर्डर सिक्युरिटी फोर्सने फॉरवर्ड एरियात सुधारणा केली आहे. ऑपरेशन आवश्यकतेसाठी नवीन तंत्रज्ञान खरेदी केले आहे. घुसखोरीच्या आव्हानाला प्रभावीपणे तोंड देण्यासाठी बीएएसएफ लक्ष केंद्रीत करत आहे असे त्यांनी सांगितले. जम्मू काश्मीरच्या बडगाम जिल्ह्यातील हुमहामा येथे बीएसएफ फ्रंटियर हेडक्वार्टरमध्ये माहीती देताना ते पुढे म्हणाले दहशतवादी घुसखोरीसाठी नवा मार्ग शोधत आहेत, कारण पाकिस्तानी सैन्य आणि पाक दहशतवादी संयुक्त रेकी करत आहे. परंतु भारतीय सैन्य सर्व परिसरात मजबुतीने त्यांच्यावर भारी पडत आहे. बीएसएफचे जावानाने एंटी टेरर ऑपरेशनमध्ये चांगले यश मिळवले आहे परंतु ऑपरेशन सिंदूरमध्ये सैन्याने प्रोफेशनल पद्धत अवलंबली. आम्ही अचूक टार्गेट करत शत्रूच्या ठिकाणांना उद्ध्वस्त केले. ऑपरेशन सिंदूरमध्ये सीमेपलीकडील लॉन्चिंग पॅड उद्ध्वस्त केले, तर सैन्यासोबत मिळून सीमावर्ती भाग आणि इतर भागात २२ ऑपरेशन करण्यात आले. ज्यात दहशतवाद्यांना कंठस्नानी घातले आणि मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा सापडला असेही आयजी अशोक यादव यांनी सांगितले. दरम्यान, लष्करासोबत मिळून सीमावर्ती भागात चांगली पकड बनवली आहे. ज्यामुळे २०२५ मध्ये घुसखोरीच्या ४ प्रयत्नांमध्ये ८ दहशतवाद्यांना ठार केले. बीएसएफने देशातंर्गत भारतीय लष्कर, जम्मू काश्मीर पोलीस आणि सीआरपीएफसोबत मिळून २२ संयुक्त ऑपरेशन केले. ज्यात नॉर्थ काश्मीरात काही दहशतवाद्यांना मारले. आम्ही अनेकवेळा दहशतवादी हालचालींची माहिती लष्कराला दिली आहे. सध्या १५० दहशतवादी घुसखोरी करण्याच्या तयारीत आहेत. पहलगाम हल्ल्यानंतर गुलमर्ग बाउल आणि इतर संवेदनशील भागात सुरक्षा वाढवण्यात आली आहे, जेणेकरून पर्यटकांना टार्गेट करण्याचा दहशतवाद्यांचा कुठलाही प्रयत्न वेळीच हाणून पाडता येईल असेही आयजी अशोक यादव यांनी म्हटले असले तरी पुन्हा एकदा ऑपरेशन सिंदुर राबविण्याची शक्यता नाकारात येत नाही. मुळात आपल्या देशातील सीमावर्ती भागात कडक नियोजनाची गरज आहे. सीमावर्ती भागातून तसेच जंगल व झाडी मोठ्या प्रमाणात असल्याने लपून भारतात घुसखोरी केली जाते. मुळात सीमावर्ती भाग डोंगराळ तेही उंच डोंगर दऱ्याखोऱ्याचा भाग आहे. अशा ठिकाणाहूल लपून अतिरेक्याची घुसखोरी होते. त्याच प्रमाणे भारतातील स्थानिकांचा संबंध ठेऊन काही वेळा घुसखोरी होते. मुळात स्थानिक भाऊ-बंधकीचा लाभ पाक अतिरेकी घेतात हे उघड आहे. कारण भारतरातील काहीचा संबंध असल्याने अनेक अतिरेकी कारवाया यशस्वी झाल्या आहेत हे मान्यच केले पाहिजे. मुळात भारतीयाचे रक्त थंड आहे याचाच फायदा पाकिस्तानी उचलत आहेत. पाकिस्तानी नागरिक भारताला मित्र मानत नाहीत तर दुष्मन समजतात. त्यामुळे भारतीयांनी सतत जागृत राहवे लागते. भारतीय जागृत आहे का नाहीत हे परवाच्या दिल्लीतील स्फोटाच्या घटनेवरून दिसून आहे आहे. आपल्याच देशातील विद्यापीठात शिक्षण घेऊन आपल्याच देशातील नागरिकांना स्फोट घडऊन मारणे हा हिंसक प्रकार जगात पाकिस्तानी धार्जिंनीशिवाय दुसरे कोणीही करीत नाहीत. केवळ हिंसा घडविणे हा एक कलमी कार्यक्रम पाकिस्तानीचा आहे तरी भारतातील मंडळी 'एका गालात मारले तर दुसरे काल पुढे करतात' अशी मानसिकतेचे भारतीय आहेत. त्यामुळे भारतात यावे, शिक्षण घ्यावे व भारतात स्फोट घडविले जात आहेत. यापेक्षा दुसरे दुर्दैवी नाही. त्यामुळे आता तरी भारतीयांनी सावध झाले पाहिजे. आता तरी लाड कमी केला पाहिजे. नसता एक ना एक दिवस पारतंत्र्य नशीबी आल्याशिवाय राहाणार नाही. वास्तविक हिंदुस्थान हा पाकिस्तान व्हावा अशी काहीची ईच्छा आहे त्यामुळे तर पाक अतिरेकीची फावले जात आहे. भारतात घुसखोरी होते कसे? पलगाम घटना घडती कसे? यामागील भारतातील सुत्रधार असल्याशिवाय भारतात यशस्वी कामगिरी होत नाही हे तसे सर्वांना माहिती आहे. तरी भारतीय शांत आहेत. पेटून उटत नाहीत. भारतीय जर पेटून उठले तर पाकिस्तान हा बेचिखा झाल्याशिवाय राहाणार नाही. थंड रक्ताच्या मंडळींना काय म्हणावे? त्यामुळे जो पर्यंत पाकिस्तान हा देश जगाच्या नकाशावर दिसणार आहे तो पर्यंत दहशदवाद हा संपणार नाही. अतिरक्यांना खतपाणी घालणारा म्हणजे पोसणारा देश आहे. हे जगाला माहिति असताना कोणी याबाबत गांर्भीयाने घेत नाही म्हणून आज देशात दिल्ली म्हणजे देशाच्या राजधानीत स्फोट घडविले जातात, घुसखोरी केली जाते. कितीही रोखले तर घुसखोरी चालू आहे यामुळे भारताची वचक कमी झाली आहे हे उघड दिसून येत आहे.

## हिवाळ्यात कोरड्या त्वचेला मऊ आणि चमकदार कसं बनवायचं? 'हे' घरगुती उपाय करतील मदत



हिवाळ्यात, कमी आर्द्रता आणि कोरडी हवा यामुळे त्वचा कोरडी होऊ शकते. यामुळे त्वचा निस्तेज आणि निर्जीव दिसू शकते. चेहऱ्यावरील चमक देखील कमी होते. म्हणून, हिवाळ्यात त्वचेची अतिरिक्त काळजी घेणे आवश्यक असते. बहुतेक लोक हायड्रेटिंग फेस मास्क आणि फेशियलचा अवलंब करतात.

परंतु, कोरड्या त्वचेवर उपचार करण्यासाठी तुम्ही काही घरगुती उपाय देखील वापरू शकता. ही उत्पादने त्वचा उजळवण्यास आणि ती चमकवण्यास मदत करू शकतात. ही उत्पादने लावल्याने डाग देखील दूर होतात. हिवाळ्यात कोरडी त्वचा मऊ आणि चमकदार कशी बनवायची ते जाणून घेऊया..

हिवाळ्यात कोरड्या त्वचेला मऊ आणि चमकदार कसं बनवायचं? हे घरगुती उपाय करतील मदत

**मध–**

मध त्वचेसाठी देखील अत्यंत फायदेशीर आहे. हिवाळ्यात तुम्ही ते तुमच्या चेहऱ्यावर वापरू शकता. मधातील मॉइश्चरायझिंग गुणधर्म त्वचेला मऊ आणि चमकदार बनवतात. हे करण्यासाठी, एक चमचा मध घ्या आणि ते चेहऱ्यावर लावा, २-३ मिनिटे हलक्या हाताने मसाज करा. १०-१५ मिनिटांनी, साध्या पाण्याने चेहरा धुवा. यामुळे रंग स्वच्छ होईल आणि त्वचा चमकेल. मध त्वचेची चमक देखील वाढवते. मधाची पेस्ट लावल्याने त्वचेच्या अनेक समस्या दूर होतात.

**बेसन–**

हिवाळ्यात तुम्ही चेहऱ्यावर बेसन देखील वापरू शकता. यासाठी २ चमचे बेसन घ्या आणि त्यात थोडे दह्याचे मिश्रण करा. ही पेस्ट तुमच्या चेहऱ्यावर लावा आणि १५-२० मिनिटे तसेच राहू द्या. बेसन डाग आणि मुरुमे कमी करण्यासाठी देखील प्रभावी आहे. तुम्ही ही पेस्ट दररोज वापरू शकता. यामुळे तुमच्या त्वचेची चमक देखील सुधारेल.

**केळीची पेस्ट–**

हिवाळ्यात तुमच्या चेहऱ्यावरील कोरडेपणा दूर करण्यासाठी तुम्ही केळीची पेस्ट देखील वापरू शकता. केळीमुळे त्वचा मऊ आणि चमकदार होते. अर्धे केळ घ्या आणि ते चांगले मॅश करा. पेस्ट तुमच्या चेहऱ्यावर लावा आणि २० मिनिटे तसेच राहू द्या. त्यानंतर, कोमट पाण्याने चेहरा धुवा. यामुळे तुमच्या त्वचेची चमक देखील सुधारेल. केळीची पेस्ट लावल्याने डाग दूर होण्यास मदत होते.

**पपईची पेस्ट–**

हिवाळ्यात पपईची पेस्ट लावणे देखील फायदेशीर आहे. तुम्ही तुमच्या चेहऱ्यावर पपईची पेस्ट वापरू शकता. यासाठी, चांगली पिकलेली पपई थोडीशी घ्या आणि मॅश करा. ही पेस्ट तुमच्या चेहऱ्यावर लावा आणि २० मिनिटांनी सामान्य पाण्याने धुवा. पपईमध्ये असलेले गुणधर्म त्वचेवरील डाग आणि डाग देखील दूर करतात. ही पेस्ट लावल्याने त्वचेची चमक देखील सुधारते. हिवाळ्यात तुम्ही पपईची पेस्ट चेहऱ्यावर देखील लावू शकता.

**कोरफड–**

जर तुमची त्वचा हिवाळ्यात जास्त कोरडी होत असेल तर तुम्ही कोरफडीचा वापर करू शकता. कोरफडीच्या जेलमध्ये मॉइश्चरायझिंग गुणधर्म असतात जे त्वचेला आर्द्रता देतात. कोरफडीचा जेल त्वचा मऊ आणि चमकदार बनवते. हे करण्यासाठी, कोरफडीचा जेल चेहऱ्यावर लावा आणि रात्रभर तसेच राहू द्या. सकाळी कोमट पाण्याने चेहरा धुवा. यामुळे त्वचेची चमक सुधारेल. कोरफडीचा जेल त्वचेला थंड करतो आणि जळजळ कमी करतो. कोरफडीचा जेल त्वचेची सूज कमी करण्यासाठी देखील प्रभावी आहे.

## जागतिक दिव्यांग दिनानिमित्त...............

**प्रस्तावना:**

मानवाच्या जीवनात शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकांतील अक्षरे नव्हे; तर विचार, आत्मविश्वास, संस्कार आणि सामर्थ्याची शिदोरी आहे.

प्रत्येक मुलगा/मुलगी आपल्या आयुष्याची सुरुवात एकसमान स्वप्नांसह करतो/करते. परंतु काही मुलांना शारीरिक, मानसिक, बौद्धिक किंवा संवेदनाक्षम कमतरतेमुळे समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर ठेवले जाते. या अंतराला शिक्षणच संपवू शकते.

पूर्वी ''अपंग'' या शब्दामुळे ही मुले दयेची, हेटाळणीची पात्र वाटत. परंतु ''दिव्यांग'' हा शब्द त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील दैवी सामर्थ्याची ओळख करून देतो. हा शब्द एका समाजाच्या दृष्टीकोनात झालेल्या सकारात्मक परिवर्तनाचा पुरावा आहे.

**१) दिव्यांगत्वाची संकल्पना आणि कायदेशीर व्याख्या:**

दिव्यांगत्वाच्या प्रमुख श्रेणींमध्ये अंधत्व व अल्पदृष्टी, कर्णबधिरता व भाषणदोष, बौद्धिक अक्षमता व मानसिक आजार, ऑटिझम स्पेक्ट्रम डिसऑर्डर, शिकण्यातील अडचणी जसे की , सेरेब्रल पाल्सी, कुष्ठरोगमुक्त व्यक्ती आणि बहुविध दिव्यांगत्व यांचा समावेश होतो.

१. दिव्यांगत्वाच्या प्रमुख श्रेणी
१) अंधत्व व अल्पदृष्टी
२) कर्णबधिरता व भाषणदोष
३) बौद्धिक अक्षमता व मानसिक आजार
४) ऑटिझम
५) शिकण्यातील अडचणी ( इ.)
६) सेरेब्रल पाल्सी
७) कुष्ठरोगमुक्त व्यक्ती
८) बहुविध दिव्यांगत्व इत्यादी २१ प्रकार सांगितले आहेत.

दिव्यांगत्व ही कमतरता नसून वेगळेपण आहे. योग्य मदत मिळाल्यास हे विद्यार्थी दैनंदिन जगण्याच्याच नव्हे तर अद्वितीय कार्याच्या शिखरावर पोहोचू शकतात.

**२. दिव्यांग शिक्षणाचे सामाज–मानसशास्त्रीय महत्त्व:**

दिव्यांग विद्यार्थ्यांचा आत्मसन्मान वाढतो, कारण शिक्षण त्यांना दयेची नव्हे तर सन्मानाची वागणूक मिळवून देते. शिक्षणामुळे ते स्वावलंबी होत जातात, ज्यामुळे कुटुंब आणि समाजावरच्या अवलंबित्वात लक्षणीय घट होते. प्रत्येक व्यक्तीत दडलेली क्षमता विकसित होत असल्याने कला, विज्ञान किंवा तंत्रज्ञान या कोणत्याही क्षेत्रात ते उल्लेखनीय यश मिळवू शकतात. शिक्षणामुळे भेदभाव कमी होतो आणि समाजात सहजीवनाची संस्कृती दृढ होते.

**३. दिव्यांग शिक्षणाचे सकारात्मक परिणाम:**

दिव्यांग विद्यार्थ्यांचा आत्मसन्मान वाढतो, कारण शिक्षण त्यांना दयेची नव्हे तर सन्मानाची वागणूक मिळवून देते.शिक्षणामुळे ते स्वावलंबी होत जातात, ज्यामुळे कुटुंब आणि समाजावरच्या अवलंबित्वात लक्षणीय घट होते. प्रत्येक व्यक्तीत दडलेली क्षमता विकसित होत असल्याने कला, विज्ञान किंवा तंत्रज्ञान या कोणत्याही क्षेत्रात ते उल्लेखनीय यश मिळवू शकतात. शिक्षणामुळे भेदभाव कमी होतो आणि समाजात सहजीवनाची संस्कृती दृढ होते. शिक्षणामुळे दिव्यांग विद्यार्थी निर्भरतेतून स्वाभिमानाकडे प्रवास करतात.

**४. दिव्यांग शिक्षणातील मुख्य संकल्पना**

समावेशक शिक्षण–

समावेशक शिक्षणामध्ये दिव्यांग व सामान्य विद्यार्थी एकाच वर्गात समान संधींनी शिकतात, ज्यामुळे ''तो वेगळा आहे'' ही भावना कमी होऊन ''तो माझ्यासारखाच आहे'' हा स्वीकार वाढतो.

विशेष शिक्षण–

विशेष शिक्षण त्या विद्यार्थ्यांसाठी असते, ज्यांना वयोमानापेक्षा भिन्न गती व पद्धतीने शिकणे आवश्यक असते; अशा शाळांमध्ये त्यांच्या गरजांनुसार अनुकूल वातावरण आणि आवश्यक शैक्षणिक तज्ञ उपलब्ध असतात.

वैयक्तिकृत शिक्षण योजना –

म्हणजे प्रत्येक मुलाच्या बुद्धिमत्ता, आवडीनिवड, कौशल्ये आणि अडचणी लक्षात घेऊन केलेली एक वैयक्तिक शिकण्याची योजना असून, ती विद्यार्थ्याला ''आपल्या पद्धतीनं शिकण्याची'' स्वायत्तता देते.

**५. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शैक्षणिक सुविधा**

भौतिक सुविधा–
रॅम्प, रेलिंग, लिफ्ट
सर्वसमावेशक पायाभूत सुविधा
शैक्षणिक साधने–
ब्रेल, श्रवणयंत्र,
टच-स्क्रीन, व्हॉईस टेक्नॉलॉजी
मूल्यमापन सुविधा–
लेखक/वाचक सहाय्य
अतिरिक्त वेळ
अनुकूल प्रश्नपत्रिका
आर्थिक सुविधा–
शिष्यवृत्ती, वाहतूक, निवास
वैद्यकीय सुविधा

**६. शिक्षकांची भूमिका व प्रशिक्षण:**

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षक केवळ ज्ञान देणारा नाही, तर आशेचा किरण दाखवणारा जीवनदृष्टिदाता आहे.

**कर्तव्ये–**

१) शिक्षकांनी दिव्यांग विद्यार्थ्यांशी नेहमी संवेदनशील आणि संयमाने वागले पाहिजे.

२) त्यांनी विद्यार्थ्यांचे दोष न पाहता, त्यांच्या सामर्थ्यांची ओळख करून ते विकसित करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

३) विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या प्रत्येक छोट्या यशाचेही कौतुक केल्यास त्यांना पुढे जाण्याची प्रेरणा मिळते.

४) शिक्षकांनी पालकांशी नियमित संपर्क ठेवून विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत सामायिक प्रयत्न केले पाहिजेत.

७.मुख्य योजना
१) शालेय शिष्यवृत्ती
२) उच्च शिक्षण शिष्यवृत्ती
३) वाचक व प्रकल्पभत्ता
४) स्वयंरोजगार योजना
५) व्यावसायिक प्रशिक्षण

दिव्यांग विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षणाच्या साहाय्याने रोजगारक्षम बनवून स्वाभिमानाने जगण्यास सक्षम करणे, हे सर्व शैक्षणिक योजनांचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

८. कायदे व धोरणे
८.१ दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६
८.२ राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०
८.३ शासकीय सेवेत ४% आरक्षण
८.४ सार्वजनिक ठिकाणी अडथळामुक्त वातावरण

ही धोरणे दयेवर नव्हे, हक्कांवर आधारित आहेत.

९. आजची स्थिती व आव्हाने

ग्रामीण भागात अद्याप आवश्यक सुविधा उपलब्ध नसणे, प्रशिक्षित विशेष शिक्षकांचे प्रमाण अपुरे असणे, पालक व समाजाला योजनांची आणि अधिकारांची पुरेशी माहिती नसणे, काही ठिकाणी भेदभाव कायम असणे आणि डिजिटल साधनांअभावी शिकण्यात अडथळे येणे ही प्रमुख आव्हाने आहेत.

१०. सकारात्मक बदल
मानसिकता बदलते आहे
सुविधा वाढत्या प्रमाणात उपलब्ध होत आहेत

**आव्हाने–**
१) ग्रामीण भागात सुविधा अपुऱ्या
२) विशेष शिक्षकांचे प्रमाण कमी
३) माहितीचा अभाव
४) अजूनही काही समाजगटांत भेदभाव
५) डिजिटल

**''कायदे बदलले; आता मन बदलणे बाकी आहे.''**

११. सुधारणा व उपाययोजना
११.१ जनजागृती
११.२ सर्व शाळांमध्ये समावेशकता
११.३ तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर
११.४ शिक्षक प्रशिक्षण बळकट करणे
११.५ पालक-शिक्षक संवाद वाढवणे
११.६ संसाधन केंद्रे स्थापन करणे
१२. प्रेरणादायी उदाहरणे

सुदा चंद्रन, हेलन केलर आणि निक व्हुजिसीक यांसारख्या व्यक्तींनी परिस्थिती आणि शारीरिक मर्यादा यांना आव्हान देत मोठे यश मिळवले; मर्यादा ही फक्त मनात असते, हे त्यांनी सिद्ध केले. दिव्यागता ही मर्यादा नाहीत; फक्त लक्षात आणून देणारे व मार्गदर्शन करणारे हात हवेत हे या व्यक्तींनी सिद्ध केले

**१३. निष्कर्ष**

दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये दृढ मनाचे पर्वत असतात,जोपर्यंत त्यांना ढकलणारा हात, समजून घेणारा शिक्षक आणि स्वीकारणारा समाज मिळत नाही तोपर्यंत ते अदृश्य राहतात. दिव्यांग व्यक्तींच्या शिक्षणाचे तत्त्वज्ञान एकाच वाक्यात ''दया नाही संधी द्या!'' व्यक्तीची क्षमता दडपून ठेवणारी प्रत्येक भिंत शिक्षणाने पाडूया, हीच खरी समतोल समाजाकडची वाटचाल! अंतिम संदेश ''दिव्यांग नव्हे, सक्षम फक्त संधी हवी.''

''शिक्षण प्रत्येकासाठी कारण भविष्य कोणाचेही असू शकते!''



**डॉ. संदीपान गुरुनाथ जगदाळे**
**दयानंद कला महाविद्यालय, लातूर**
**मो. ९६३७१९३०३०**

## गर्लफ्रेंड किंवा बॉयफ्रेंड व्हॉट्स ॲपवर केले ब्लॉक तुम्ही स्वत:ला करू शकता या तीन स्टेपमध्ये अनब्लॉक

व्हॉट्सॲपवर ब्लॉक करण्याचा खेळ खूप जुना आहे. गर्लफ्रेंड आणि बॉयफ्रेंडमध्ये थोडेफार मतभेद झाले असतील, तर दोघांपैकी एक दुसऱ्याला व्हॉट्सॲपवर ब्लॉक करतो. तुम्हालाही एखाद्याने ब्लॉक केले असेल, तर आता तुम्हाला काळजी करण्याची गरज नाही.

कारण इथे आम्ही तुम्हाला सांगणार आहोत की व्हॉट्सॲप ब्लॉक झाल्यास ते कसे अनब्लॉक करायचे. ज्याचे अनुसरण करून तुम्ही काही मिनिटांत स्वत:ला अनब्लॉक करू शकता.

सर्वप्रथम, समोरच्या व्यक्तीने तुम्हाला ब्लॉक केले आहे की नाही याची खात्री करा. प्रथम संदेश पाठवण्याचा प्रयत्न करा. जर तुम्हाला डबल टिक दिसत नसेल आणि सिंगल टिक दिसत असेल तर समजून घ्या की समोरच्या व्यक्तीने तुम्हाला ब्लॉक केले आहे. समोरच्या व्यक्तीचा फोन बंद असण्याची शक्यता आहे. अशा स्थितीत तुम्हाला कॉमन फ्रेंडकडून कन्फर्मेशन मिळू शकते. जर तुम्हाला ब्लॉक केले असेल, तर तुम्ही स्वत:ला अशा प्रकारे अनब्लॉक करू शकता.

या ट्रिकने स्वत:ला करा अनब्लॉक

स्टेप १: सर्व प्रथम, व्हाट्सएप सेटिंग्जवर जा आणि नंतर ''खाते हटवा'' पर्याय निवडा. होय, तुम्ही ते बरोबर वाचले आहे. आता तुमच्या फोनवर ॲप पुन्हा इंस्टॉल करा आणि तुमचे खाते पुन्हा तयार करा.

स्टेप २: ॲप पुन्हा इंस्टॉल केल्यानंतर, ज्यांनी तुम्हाला ब्लॉक केले आहे त्यांना तुम्ही संदेश पाठवू शकाल.

स्टेप ३: लक्षात ठेवा, जर तुमचे व्हॉट्सॲप खाते हटवले गेले, तर तुम्हाला सर्व व्हॉट्सॲप ग्रुपमधून काढून टाकले जाईल. त्यामुळे तुम्हाला पुन्हा त्यांच्यात सामील व्हावे लागेल किंवा ते ग्रुप तुमच्यासाठी महत्त्वाचे नसतील, तर तुम्ही त्यांच्याकडे दुर्लक्ष करू शकता.

तुम्ही तुमच्या सामान्य मित्रांपैकी एकाला एक ग्रुप तयार करण्यास सांगू शकता, ज्यामध्ये तुमचा आणि त्या व्यक्तीचा समावेश आहे. अशा प्रकारे तुम्ही ग्रुपमधील त्या व्यक्तीला मेसेज पाठवू शकाल आणि तो तुम्हाला अनब्लॉक करण्याची शक्यता आहे.

## फळांवर का असतात स्टिकर्स, हे तुम्हाला माहीत आहे का

तुम्हीही जेव्हा तुम्ही फळे आणि भाजीपाला घेण्यासाठी बाजारात जाता, तेव्हा काही फळे साधारणपणे गाडीवर ठेवलेली असतात, तर काही फळे गाडीवर सजवून त्यावर स्टिकर्स लावलेले असतात. ही फळे गाडीवर ठेवलेल्या इतर फळांपेक्षा वेगळी दिसतात. या स्टिकर्सकडे पाहून बहुतेकांना वाटते की त्यांची गुणवत्ता अधिक चांगली असेल. हे प्रीमियम दर्जाचे असतील आणि पुन्हा बाहेरून आयात केले गेले आहेत. पण एक गोष्ट मान्य करावी लागेल की स्टिकर्स असलेली फळेही खूप महाग दिसतात. बरे वाटावे म्हणून अनेक वेळा लोक ही फळे खरेदी करतात. फळ विक्रेतेही लोकांच्या या मानसिकतेचा पुरेपूर फायदा घेत प्रीमियम दर्जाचा दावा करून परदेशातून आयात करून तुमची फसवणूक करतात.

पण तुम्ही कधी विचार केला आहे का की हे स्टिकर्स लावण्याचा अर्थ काय आहे वास्तविक, या स्टिकर्सचा निर्यात-आयात किंवा फळांच्या किमतीशी काहीही संबंध नाही, उलट त्याचा थेट संबंध तुमच्या आरोग्याशी आहे. फळांवरील स्टिकर्सचा तुमच्या आरोग्यावर कसा परिणाम होतो ते आम्ही तुम्हाला सांगतो.

जर तुम्हाला सफरचंद किंवा संत्र्यावर ४ अंकी स्टिकर दिसला, तर ते खरेदी करण्यापूर्वी काळजी घ्या. या ४ अंकी काड्यांवरील संख्या देखील ४ ने सुरू होते. अशी फळे पिकवताना कीटकनाशके आणि रसायनांचा वापर करण्यात आला आहे. हे आकडे फळांची गुणवत्ता दर्शवतात. तुम्हाला ही फळे थोडी स्वस्तात मिळू शकतात, पण ते तुमच्या आरोग्यासाठी चांगल्यापेक्षा जास्त हानी पोहोचवू शकतात.

काही फळांच्या स्टिकर्सवर ५ अंकी क्रमांक लिहिलेले असतात. ज्या स्टिकर्समध्ये ५ अंक आहेत ते ८ ने सुरू होतात. ८२१३१ किंवा ८७५१२ प्रमाणे, याचा अर्थ असा होतो की अशी फळे अनुवांशिकरित्या सुधारित केली जातात. म्हणजे ही फळे नैसर्गिक नसून ती प्रयोगशाळेत उगवली गेली आहेत. अशा फळांची किंमत जास्त असते. जर आपण त्याच्या आरोग्यावरील परिणामाबद्दल बोललो, तर त्याचे काही फायदे आहेत आणि काही तोटे देखील आहेत.

आता जाणून घेऊया कोणती फळे खरेदी करावीत. जी फळे चांगली असतात त्यांना ५ अंकी स्टिकर्स असतात आणि ते ९ ने सुरू होतात. ९ पासून सुरू झालेली ही फळे रासायनिक आणि कीटकनाशकांशिवाय सेंद्रिय पद्धतीने तयार केली जातात. आम्ही तुम्हाला सांगतो की या फळांची किंमत थोडी जास्त असते, पण ते आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात.

## केस वेगाने वाढण्यासाठी मदत करते जास्वंद तेल, घरी कसे बनवायचे जाणून घ्या

जास्वंदचे फूल हे अनेक गोष्टींसाठी देखील वापरले जाऊ शकते. ते त्वचा आणि केसांसाठी खूप फायदेशीर आहे. जर आपण त्याच्या तेलाबद्दल बोललो तर ते केसांच्या अनेक समस्या दूर करण्यास मदत करते.

जास्वंदचे तेल वापरल्याने केस गळण्याची समस्या दूर होते आणि जर केस वाढत नसतील तर केस वाढू लागतात. तुम्ही हे तेल काही घटकांच्या मदतीने घरी देखील बनवू शकता. घरी जास्वंदचे तेल कसे बनवता येते आणि त्याचे फायदे काय आहेत ते जाणून घेऊया.

केस वेगाने वाढण्यासाठी मदत करते जास्वंद तेल, घरी कसं बनवायचं जाणून घ्या

जास्वंदचे तेल कसे बनवायचे?

. नुसार, सर्वप्रथम ८ जास्वंदची फुले आणि ८ पाने घ्या आणि त्यांची बारीक पेस्ट बनवा.

-एक कप खोबरेल तेल गरम करा आणि त्यात पेस्ट घाला.
-काही वेळ गरम होऊ द्या आणि नंतर थंड होऊ द्या.
-आता हे तेल वापरण्यासाठी तयार आहे.
-डोक्याला १० मिनिटे मसाज करा आणि अर्धा तास राहू द्या.
-यानंतर, डोके धुवा.

केसांसाठी जास्वंदच्या तेलाचे फायदे-

-हे तेल केसांच्या आरोग्यासाठी खूप चांगले आहे. ते केस गळणे थांबवते आणि चांगले आणि चमकदार केस मिळविण्यास मदत करते.

जास्वंदच्या फुलांचे तेल केसांना वाढवते.
जास्वंदच्या फुलांचे तेल केसांमधील कोंडा दूर करते.
जास्वंदच्या फुलांचे तेल केसांना मॉइश्चरायझ करते.

केस धुण्यापूर्वी तुम्ही हे तेल प्रत्येक वेळी वापरू शकता परंतु लक्षात ठेवा, जेव्हा तुम्ही ते नियमितपणे वापरता आणि योग्यरित्या मालिश करता तेव्हाच तुम्हाला त्याचे फायदे मिळण्यास सुरुवात होईल.



# रात्री योगा करणे योग्य आहे का?

तुम्ही सकाळी लवकर उठू शकत नाही आणि दुपारी तुम्हाला योगा करण्यासाठी वेळ मिळत नाही, पण याचा अर्थ असा नाही की तुम्ही तुमच्या जीवनातून यो-गाला पूर्णपणे बाहेर काढून द्यायला पाहिजे. चांगली गोष्ट अशी आहे की योगाला तुम्ही आपल्या कार्यक्रमात कधीही फिट करू शकता. रात्री योगा करण्यात काहीच हरकत नसते. जर तुम्ही एखाद्या कॉर्पोरेट कंपनीत काम करत असाल, तर तुम्ही रात्री योगा करू शकता, कारण तुमच्याजवळ हाच एक विकल्प असतो. पण रात्री योगा करण्याअगोदर काही गोष्टी लक्षात ठेवण्यासारख्या आहे ते जाणून घ्या...जेवणानंतर तुम्हाला कमीत कमी २-३ तास योगासनाचा अभ्यास नाही करायला पाहिजे. तुम्ही तुमच्या कामानंतर थोडे फळं खाऊ शकता आणि जर तुम्ही रात्री ९ वाजता अभ्यास करणार असाल तर तुम्हाला ६.३० वाजता जेवण करायला पाहिजे.रात्री असे काही योगासने करायला पाहिजे ज्याने तुम्हाला ऊर्जा आणि शांती मिळते. काही योगासने शांत आणि सशक्त असतात आणि संध्याकाळी व रात्रीच्या वेळेस त्याचा अभ्यास चांगल्याप्रकारे होऊ शकतो.तुम्हाला हे ही प्रयत्न करायला पाहिजे की तुमचा योग अभ्यास योग निद्रासोबत संपायला पाहिजे. योग निद्रा तुमच्या अभ्यास आणि तुमच्या दिवसात एक शांतिपूर्वक माध्यम बनायला पाहिजे.जर तुमचे पीरियड्स सुरू असतील तर आधीच्या २ दिवसांमध्ये रात्री योगा करू नये. त्याशिवाय जर तुम्ही गर्भवती असाल तर रात्री योगा करणे योग्य ठरत नाही.

# दिव्यांग महिलांना आत्मविश्वास देणाऱ्या मीनाक्षी निकम

श्रीमती मीनाक्षी निकम यांना महर्षि कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचा २०२५ या वर्षाचा राष्ट्रीय स्तरावरील बाया कर्वे पुरस्कार देऊन आज (२९ नोव्हेंबर) सन्मानित करण्यात येत आहे, त्यानिमित्त...

महर्षी कर्वे स्त्री-शिक्षण संस्थेच्या वतीने देण्यात येणारा बाया कर्वे पुरस्कार यावर्षी चाळीसगाव, (जि. जळगाव) येथील मस्वयंदीपफ या संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती मीनाक्षी निकम यांना जाहीर झाला आहे. कौटुंबिक, सामाजिक, भावनिक, आर्थिक असे विविध कंगोरे असलेला व काही अंशी समाज व शासकीय पातळीवर दुर्लक्षित अशा महिला दिव्यांगांच्या गुंतागुंतीच्या प्रश्नावर गेले ३१ वर्षे त्या कार्यरत आहेत. दोन वर्षाचे वय असताना त्यांना पोलिओचे निमित्त होऊन दोन्ही पायांना अपंगत्व आले; परंतु स्वतः भोगलेले दुःख, अडचणी व कटू अनुभवांचा बाऊ न करता त्यांनाच जगण्याचे निमित्त करीत दिव्यांग स्त्रियांच्या सशक्तीकरणाकरिता त्या समर्थपणे अनेक दिव्यांग स्त्रियांमागे उभ्या राहिल्या.

मदिव्यांग घटकांकरिता शासन पातळीवरून सह अनुभूतीचा भाव राखत कल्याणकारी योजनांची निर्मिती व सुव्यवस्थापन व्हावे, तसेच दिव्यांग घटकांकडे बघण्याचा कुटुंबाचा व सामाजिक दृष्टिकोन/मानसिकता बदल होणे ही खूप मोठी आव्हाने असल्याचे मीनाक्षीताई प्रत्येक व्यासपीठावरून सांगतात. याकरिता शासन व राज्यकर्त्यांची सकारात्मक इच्छाशक्ती महत्वाची हे त्या मानतात.

राष्ट्रीय एकात्मतेच्याफ दृष्टीने या कामाचे महत्त्व आहेच. दिव्यांग हे आपल्या समाजातील एक घटक आहेत व अनेक जण देशाच्या आर्थिक प्रगतीत सहभाग देतात, त्यांचा सहभाग अधिक सन्मानपूर्वक व्हावा हा विचार मांडणार्या मीनाक्षीताईंच्या कार्याची दखल घेत त्यांना अत्यंत आदरपूर्वकरीत्या बाया कर्वे पुरस्काराने आज सन्मानित करण्यात येत आहे. एक लाख एक हजार रुपये रोख व मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.



१२५ वर्षापूर्वी भारतरत्न महर्षी कर्वे यांनी पुण्यात स्थापन केलेल्या महर्षी कर्वे स्त्री-शिक्षण संस्थेच्या वतीने संस्थेच्या शताब्दी वर्षापासून म्हणजेच १९९६ पासून सामाजिक वा शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्या महिलांना महर्षी कर्वे यांच्या पत्नी आनंदीबाई कर्वे उर्फ बाया कर्वे यांचा नावे देण्यात येणारा ङ्गबाया कर्वे पुरस्कारानेफ सन्मानित करण्यात येते. समाजाच्या उत्थानाकरिता, संबंधित समाज विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरिता एखाद्या सामजिक प्रश्नाचा पाठपुरावा करीत, त्या प्रश्नावर असामान्य व अद्वितीय असे प्रेरणादायी कार्य उभ्या करणार्या महिलांचा सन्मान यानिमिताने संस्थेमार्फत केला जातो.

कौटुंबिक पार्श्वभूमी फारशी अनुकूल नसतानाही त्यांनी सर्व अडचणींवर मात करीत मोठ्या जिद्दीने बारावीपर्यंतचे शिक्षण आणि हस्तकला - शिवणकामाचा डिप्लोमा पूर्ण केला. हे शिक्षण पूर्ण करीत असताना, अपंग स्त्रियांच्या आत्मसन्मानाकरिता आपले आयुष्य समर्पित करण्याचा निश्चयही दृढ होत गेला. प्रत्यक्ष कार्याचा श्रीगणेशा हा दोन्ही पायांनी अपंगत्व असलेल्या महिलांसाठी निवासी प्रशिक्षण व हाताला काम असा उपक्रम हाती घेत झाला.

१९९४ मध्ये त्यांनी ङ्गराज क्लासेसफ्ची स्थापना केली व दिव्यांग महिलांना पूर्णत: नि:शुल्क प्रशिक्षण या माध्यमातून देण्यास प्रारंभ झाला. आज अशा सुमारे २००० महिला याद्वारे आत्मनिर्भर झाल्या आहेत. कामाचा पसारा वाढत असताना, या कार्याला एक संस्थात्मक चौकटीत बसविण्याच्या दृष्टीने २०१६ त्यांनी ङ्गस्वयंदीपफ हा प्रकल्प सुरू केला. संस्थेच्या माध्यमातून दोन्ही पायांनी दिव्यांग असलेल्या मुलींचे पालन करणे, त्यांना शिकवणे आणि पुढे जाण्यास प्रेरित करणे ही सर्व कामे एकाच छताखाली सुरु झाली, तसेच दिव्यांग व्यक्तींसाठी रोजगार शिबिरे, पुनर्वसन कार्यक्रम आयोजित करण्याचे काम त्या सातत्याने करीत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना समाजभूषण, तेजस्विनी, प्रेरणा तसेच ङ्गउंच माझा झोकाफ पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

मस्वयंदीपफच्या कामासह त्या २०२३ पासून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावच्या सिनेट सदस्य म्हणून ही सक्रियरित्या कार्यरत आहेत. दिव्यांग घटकांचे प्रश्न, अडचणी, मर्यादा व त्यांच्या प्रति असलेला दुर्लक्षित भाव या सगळ्यावर आपल्या परखड लेखणीतून समाज प्रबोधन मअपंग स्मृतीफ साप्ताहिकाचे सह-संपादक या पदावरून म्हणून करीत आहेत.

मीनाक्षीताईंनी आपल्या कार्यातून, समाजातील एका दुर्लक्षित घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची किमया केली. हे कार्य हाती घेणे व पुढे त्यास संस्थामक आकार देणे सहज सोपे नव्हते. अनेक कडू प्रसंगातून त्या, हाती घेतलेल्या कामाशी समरस होत गेल्या.आज मीनाक्षीताईंनी हजारो स्त्रियांना त्यांचा जगण्यातील आत्मविश्वास दिला आहे. ज्या दिव्यांग घटकांच्या उन्नतीकरिता त्या समर्पित आहेत स्वतः देखील दिव्यांग आहेत.

(लेखिका महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्षा आहेत)-स्मिता कुलकर्णी

# शाळा शिक्षणासाठी की छळासाठी?

या प्रकारच्या घटना घडल्यावर त्या समाजासमोर येऊ नयेत यासाठी बर्याच शाळांच्या व्यवस्थापनाची धडपड असते. गुन्हेगारांच्या अशा साथीदारांची साखळी भक्कम असल्याने विद्यार्थी आणि पालकांवर अगतिक होण्याची वेळ येते. विद्यार्थी आणि शिक्षक, यांच्यातील संबंधांचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. शिक्षकांकडून मिळणार्या वागणुकीमुळे विद्यार्थ्यांच्या आत्महत्या वाढत चालल्या असून या घसरणीचा जेवढा निषेध करावा तेवढा कमी ठरेल. मुले-मुली कोणत्याही वयोगटातील असोत, त्यांना शाळा हे घराबाहेरचे घर वाटले पाहिजे. प्रत्यक्षात भर शाळेत आणि तेही शिक्षकांकडून मुलींवर अत्याचार झाल्याच्या घटना गेल्या काही कालावधीत उघड झाल्या. शिक्षण क्षेत्रातील या विकृतीला कसे ठेचता येईल, यावर गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे. नवी दिल्लीत कोलंबस शाळेत शिकणार्या शौर्य पाटील या विद्यार्थ्याने प्राचार्या आणि शिक्षकांच्या जाचामुळे मेट्रो स्थानकावरून उडी घेत जीवन संपवले. शौर्यच्या मृत्यूचे प्रकरण देशभर गाजले. कोलंबस शाळेची असंवेदनशीलता अशी, की शौर्य प्रकरणी आवाज उठवला, तर हातात 'टीसी' दिला जाईल, ही उघड धमकी विद्यार्थी- पालकांना देण्यात आली. चौकशी होईपर्यंत संबंधित प्राचार्या, शिक्षक यांना निलंबित करण्यात आले असले तरी ज्या रीतीने शाळा व्यवस्थापनाची कृती राहिली ते पाहता शौर्यला न्याय मिळणार का? हा प्रश्नच आहे! मध्यप्रदेशातील रतलाममध्ये मुख्याध्यापकाच्या छळाला कंटाळून आठवीच्या मुलाने तिसर्या मजल्यावरून उडी घेत आत्महत्येचा प्रयत्न केला. वर्गात त्याने रील बनविली. चूक मान्य करून या मुलाने ५२ वेळा मुख्याध्यापकांची माफी मागितली; पण त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले.



सकारात्मक शिक्षा

मानसिक छळाच्या आणि त्यातून विद्यार्थ्यांनी टोकाचे पाऊल उचलण्याच्या घटना हा आता अपवाद राहिलेला नाही. यातून शिक्षण व्यवस्थेच्या 'मानसिक आरोग्या'वरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. शिक्षकांच्या नियुक्तीसाठी सरकारने निश्चित प्रक्रिया ठरवून दिली आहे; पण परीक्षा, वैद्यकीय तपासणी याबरोबरच मानसिक तपासणीदेखील आवश्यक असल्याचे पुरेसे स्पष्ट होत आहे. त्याबद्दल शिक्षण विभागाने पावले उचलणे महत्त्वाचे ठरेल. राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने या संदर्भात 'सकारात्मक शिक्षा' या विषयावर मार्गदर्शनपर कृती सत्र आयोजित केले असून हा निर्णय स्वागतार्ह आहे. शिक्षकांसाठी हे सत्र आहे; मात्र शिक्षकी पेशाला काळिमा फासणार्या घटनांचे वाढते प्रमाण पाहता हा उपाय पुरेसा ठरणार नाही. शाळांमध्ये समुपदेशक आहेत; पण ती व्यवस्था परिणामकारक आहे का? शिक्षण क्षेत्राला कलंकित करणारे शिक्षक संख्येने कमी असतील; पण जे आहेत त्यांना थारा मिळणार नाही, हे पाहण्याची जबाबदारी कोणाची? वर्दळ असताना शाळांमध्ये दुष्कृत्य करण्याची हिंमत होते, तर मग संबंधित गुन्हेगारी प्रवृत्तीच्या शिक्षकाकडे अन्य शिक्षकांचे, शाळा अधिकार्यांचे लक्ष नसते का? की त्यांच्याकडून डोळेझाक होते? तसे होत असल्यास गुन्हेगारांच्या साखळीत तेही समाविष्ट होतात. विद्यार्थ्यांचा वाढता मानसिक छळ शिक्षण व्यवस्थेच्या विकलांग स्थिती-वर प्रकाश टाकतो. काही गुन्हे चव्हाट्यावर येतात; पण शालेय समित्यांकडे येणार्या आणि बालहक्क आयोगाकडे नोंदविल्या जाणार्या तक्रारी वेगळ्याच! ती संख्या शाळांकडून सुरक्षिततेबद्दल केले जाणारे पोकळ दावे उघडे पाडते. शाळा या शिकण्यासाठी असतात, विद्यार्थ्यांकडून होणार्या चुका दुरुस्त करण्यासाठी, त्यांना घडविण्यासाठी शिक्षक असतात; पण चुका करणार्या विद्यार्थ्यांचा शिस्तीच्या नावाखाली छळ, हा मार्ग नाही, तो यांना कोणी दाखवला? तो अधिकार आपल्याला नाही, हे शिक्षकांनी लक्षात ठेवले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाला तडा देणारे छळवणुकीचे उद्योग तातडीने बंद व्हावेत. विद्यार्थिनींवर होणार्या लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये शिक्षकांचा सहभाग असणे धक्कादायक आहेच; पण ते टोकाच्या विकृतीचेही दर्शन घडवते. अशा घटना त्या विद्यार्थिनीसह तिच्या कुटुंबावरच महाभयंकर आघात करतात. सोलापुरात एका शिक्षकाने चार विद्यार्थिनींवर अत्याचार केल्याची घटना काही महिन्यांपूर्वी घडली. बीडमध्ये दोन शिक्षकांना विद्यार्थिनींच्या छळप्रकरणी अटक झाली. शाळांवरील विश्वास उडून जावा, असे शालेय शिक्षण व्यवस्थेने ठरवले आहे का?

# आपल्याला पडणाऱ्या स्वप्नांचा अर्थ नेमका काय आहे?



आपल्यापैकी प्रत्येकाला रात्रीच्या झोपेमध्ये स्वप्ने ही कधी ना कधी पडतातच. या स्वप्नांचा आपल्या वास्तविक आयुष्याशी फारसा संबंध असतोच असे नाही, किंबहुना अनेकदा आपण स्वप्नामध्ये पाहिलेल्या वस्तू, व्यक्ती आपल्या अजिबात परिचयाच्याही नसतात. स्वप्नामध्ये एखाद्या विहिरीमध्ये साप दिसणे, कोणीतरी किंवा आपण स्वत:च विहिरीत पडले असल्याचे स्वप्न पडणे, पाण्यामध्ये बुडत असल्याचे स्वप्न, किंवा एखाद्याचा पाठलाग करीत असल्याचे स्वप्न अशी चित्रविचित्र स्वप्नेही क्वचित एखाद्याला पडत असतात. अनेकदा तर आपल्याला जाग आल्यानंतर या स्वप्नांचे अर्थ ला-वणे आपल्याला कठीण जाते. किंबहुना आपल्याला असे विचित्र स्वप्न का पडले असावे याचेच आश्चर्य आपण करीत राहतो. स्वप्नशास्त्र, हे स्वप्नांचे अध्ययन करण्याचे, त्यांचे अर्थ लावण्याचे शास्त्र आहे, या शास्त्राच्या अन-ुसार आपल्याला पडणाऱ्या स्वप्नांचा आपल्या आयुष्याशी स्पष्ट किंवा अस्पष्ट संबंध असत-ोच.अनेकदा अतिशय वाईट स्वप्ने वारंवार पडणे हे एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यामध्ये घडून येणाऱ्या वाईट प्रसंगाची पूर्वसूचना असू शकते, तर अनेक स्वप्ने ही एखाद्याच्या भावी आयुष्यामध्ये घडून येणार असलेल्या चांगल्या घटनांचा संकेत असू शकत असल्याचे स्वप्नशास्त्र म्हणते. या शास्त्राच्या अनुसार जर एखाद्या व्यक्तीने स्वत:ला वाळूवर, किंवा रेतीवर चालताना पाहिले, तर हे स्वप्न ही पुढील धोक्याची पूर्वसूचना असून, आपल्या शत्रूकडून आपल्याला मोठी हानी संभविणार असल्याचे हे सूचक असल्याचे स्वप्नशास्त्र सांगते.

## डाएटकट्टा | कमी खाण्यापेक्षा कमी वेळा खाल्ल्याने आजारांवर मात



दिवसातून फक्त दोनवेळा जेवण घेतलं पाहिजे आणि कमी जेवण्यापेक्षा कमी वेळा जेवणं गरजेचं आहे असंही डॉ. दीक्षित म्हणाले. दोनवेळा जेवतानाही ते जास्तीत जास्त ५५ मिनिटांमध्ये संपवणं गरजेचं आहे. हा डाएटप्लॅन फॉलो केल्यास वजन कमी होईल, पोटाचा घेर कमी होईल, रक्तातील तीन महिन्यातील कळणारं साखरेचं प्रमाण कमी होईल आणि फास्टिंग शुगरही कमी होईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. एकदा जेवतो तो योगी, दोनवेळा जेवतो तो भोगी आणि तीनवेळा जेवतो तो रोगी अशी संतांची शिकवण आहे,याचाही दाखला त्यांनी दिला. आहारात हे बदल केल्यामुळे वजन कमी होईल, पोटाचा घेर कमी होईल असा विश्वास त्यांनी कट्ट्यावर व्यक्त केला.

(क्रमशः)




## विनोद

राधा : काय गं राणी, तुझ्या नवऱ्याला तुरुंगात का जावे लागले?
राणी : काय नाही गं, यांनी नोटा छापायची सरकारशी स्पर्धा केली म्हणून.

## संदेश

Tourist = Ye kiska kankaal hai..?
Santa = Ye tipu-sultaan ka kankaal hai..
Tourist = Or ye bagal wala chhota sa kankaal kiska hai..?
Santa = Ye bhi tipu-sultaan ka kankaal hai.. jab wo chhota bachcha tha….

## सुविचार



शब्दांपेक्षा मौनच जास्त बोलके असते.
- कार्लाइल

**संस्कृत सुभाषित**

आयु: सत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धना:।
रस्या: ास्निग्धा: ास्थिरा हृद्या आहारा: साात्विकप्रिया : ।।

अर्थ - जो आहार आयुष्य, मनोबल, शक्ती, प्रेम, सुख यांचे संवर्धन करतो, तोच आहार साात्विक लोकांना प्रिय असतो.(हा स्निग्ध आणि रसमय आहार असतो.)

# मनोरंजक महाशब्दकोडे

कोडे क्र. २१



### आडवे शब्द

१. मराठीत जोकर
३. वार्ताहर
७. वस्तू मिळाल्याची पोहोच
९. नकाराचा शब्द
१०. कंटाळा आल्याचे दाखवणारी (अ.व.)
११. गतिमान
१३. आबालवृद्धांसाठी उपयोगी कल्प-त्यातील वनस्पती
१६. मुलींचे हे नाव बेळगावी मिठाईवरून ठेवतात की नाजुकशा फुलावरून?
१७. गडीमाणसे
२१. पद्धत
२३. कंटाळवणे, रसहीन
२५. 'च'च्या भाषते फुकट
२७. राष्ट्राची सीमा
२९अ. संधी, मोका
३१. विश्वासघातकी
३२. खेळातून बाद, हद्दपार
३३. पदर
३४. दबा धरणे
३६. किरकोळ
३९. नऊ दिवसच टिकणारे अप्रूप!
४२. लबाडीचा हेतू
४२अ. कच्चे लिखाण (इंग्रजी)
४४. कणखर, रांगडा
४५अ. सोंगट्या मांडण्याचे वस्त्र
४६. एकाग्र नजर
४८. सजीव-निर्जीव सर्व
५०. रागाचा उद्रेक
५२. एक जंगली फूल
५३. चित्रविचित्र रंगाचा, ठिपक्या ठिपक्यांचा
५४. एक प्रकारे जीवनदान!
५६अ. मन आकर्षून घेणारे
५७अ. कूळकायद्याचे मूळ तत्त्व
६१. तात्काळ, वेगात
६४. सारखा
६६. किटाळ, आळ
६८. पावलोपावली
६९. संत एकनाथांचे गुरु
७१. 'बटण स्टार्ट'मुळे आता ही कालबाह्य! (इंग्रजी)
७२. पावसाची झड
७३. नवरत्नांपैकी प्राणिज रत्न
७४. कारस्थानी
७५. पाताळ, विनाशाची गर्ता
७६. अभिप्राय

### उभे शब्द

१. सर्वनाश घडवून आणणारे
२. कन्या (संस्कृत)
३. बोरींच्या गावचे काटेरी झाड
४. काव्यात त्याला
५. वैरी, खटला गुदरणारा
६. अंगातील मस्ती, जोम
७. जन्मदाता
८. अशुभ घटनेचा संशय दर्शवणारा वाकप्रचार
१२. 'बोलीची काढी- बोलाचाच भात' रांधणारा!
१४. उपवासाचे तांदूळ
१५. साग्रसंगीत
१८. मांडणी
१९. मिसळीतील तर्री
२२. ईर्ष्या, ठाम निश्चय
२४. टाळाटाळ, चुकवाचुकव
२६. वार
२८. तडीपार
२९. मिठाची चव
२९अ. अमावस्या
३०. वारा (संस्कृत)
३१. होमातील आहुती
३२अ. चकवून जाण्याचा मार्ग
३५. सैन्याची तुकडी
३७. घाबरणे, धास्ती घेणे
३८. तफावत, अंतर
३८अ. कणखर (इंग्रजी)
४०. जंगलातील प्राणी
४१. मुलींचे एक नाव
४२. कंप पावणारा
४३. केर
४५. शेवटचे वस्त्र!
४६. पहिला अंक
४७. शेंगेवरील आवरण
४९. संघर्षात रक्त सांडणे
५१. घटस्फोट
५३. दगडाचा पातळ पापुद्रा
५५. गव्हाचे शिजवलेले सत्त्व
५६. खळबळजनक
५८. सेनानायक
५९. राजीनामा
६०. हिंदीतील मूळ, मराठीत वजनदार
६१अ. धान्य साठवणीचे पात्र
६२. डागाळलेला
६३. स्पष्टवक्ता, तोंडाळ
६५. मनगटात जोर असलेला
६७. आपला देश
६९. सततचे नामस्मरण
७०. पुरुष
७२. समान, तुल्यबळ

### आडवे उत्तर

१.विदूषक ३.बातमीदार ७.जमापावती ९.नाही १०.जांभया ११.वेगवान १३.शतावरी १६.कुंदा १७.चाकरचुकर २१.रीत २३.रटाळ २५.चकटफू २७.सरहद्द २९अ. अवसर ३१.हरामखोर ३२.कटाप ३३.पालव ३४.टपणे ३६.सटरफटर ३९.नवलाई ४२.कावा ४२अ.रफ ४४.राकट ४५अ. पट ४६.एकाटक ४८.चराचर ५०.फणकारा ५२.कणेर ५३.कबरा ५४.रक्तदान ५६अ.मोहक ५७अ.कसेल त्याची जमीन ६१.तडकफडक ६४.सम ६६.बालंट ६८.पदोपदी ६९.जर्नादन ७१.किक ७२.सर ७३.मोती ७४.कपटी ७५.रसातळ ७६.मत

### उभे उत्तर

१.विनाशक २.दुहिता ३.बाभळी ४.तया ५.दावेदार ६.राग ७.जनक ८.पाल चुकचुकणे १२.वाचाळ १४.वरी १५.रीतसर १८.रच १९.कट २२.जिद्द २४.टालमटोला २६.घाव २८.हद्दपार २९.खारट २९अ. अवस ३०.समीर ३१.हवन ३२अ.पळवाट ३५.पलटण ३७.टरकणे ३८.फरक ३८अ. टफ ४०.वनचर ४१.ईरा ४२.कापरा ४३.कचरा ४५.कफन ४६.एक ४७.टरफल ४९.रक्तपात ५१.काडीमोड ५३.कपची ५५.चीक ५६.सनसनाटी ५७.हक ५८.सेनापती ५९.त्यागपत्र ६०.जड ६१अ.डबा ६२.कलंकित ६३.फटकळ ६५.मर्द ६७.भारत ६९.जप ७०.नर ७२.सर



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### लॉर्ड ठाकूरने १८ चेंडूत घेतल्या ५ विकेट्स, निम्मा संघाला धाडला माघारी

मुंबई-सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेत भारतातील फलंदाज आपल्या शतकी व वेगवान खेळींनी सर्वांचं लक्ष वेधून घेत असतानाच शार्दुल ठाकूरने आपल्या गोलंदाजीची छाप पाडली आहे. शार्दुलने भेदक गोलंदाजी करत खतरनाक स्पेलमध्ये ५ विकेट्स घेण्याचा पराक्रम केला. मुंबईचा कर्णधार लॉर्ड ठाकूरने आसामविरूद्ध सामन्यात ३ षटकांत ५ विकेट्स घेतल्या आहेत.मुंबई आणि आसाम यांच्यात सय्यद मुश्ताक अली स्पर्धेतील सामना खेळ-वला जात आहे. या स्पर्धेत सर्फराझ खानच्या शतकासह मुंबई संघाने २२२ धावांचा डोंगर उभारला. मुंबईने दिलेल्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना आसामचा निम्मा संघ सुरूवातीच्या षटकांमध्येच माघारी परतला, याचं श्रेय कर्णधार शार्दुल ठाकूरच्या भेदक गोलंदाजीला जाते. आसामच्या संघाने ५० धावांच्या आत ५ विकेट्स गमावले.शार्दुलने १.१ षटकांत म्हणजेच अवघ्या ७ चेंडूत त्याने ४ विकेट्स घेतल्या. शार्दुलच्या गोलंदाजीसमोर आसामचे सर्व गोलंदाज जणू निष्प्रभ ठरले. सुरूवातीच्या २ षटकांत ४ विकेट्स घेतल्यानंतर पुढच्या षटकात शार्दुलने अजून एक विकेट मिळवत टी-२० क्रिकेटमध्ये ५ विकेट्स घेण्याचा विक्रम केला.

### अखिल भारतीय वन क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र वन विभागाचा देशात चौथा क्रमांक

मुंबई-डेहराडून, उत्तराखंड येथे आयोजित २८ व्या अखिल भारतीय वन क्रीडा संमेलन २०२५ मध्ये महाराष्ट्र वन विभागाने उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. महाराष्ट्राने या स्पर्धेत ३१ सुवर्ण, २६ रौप्य आणि २० कांस्य अशी एकूण ७७ पदके जिंकत २८६ गुणांसह देशात चौथे स्थान पटकावले. तसेच राज्यातील १३ क्रीडापटूंनी विविध स्पर्धेत चौथे स्थान मिळवले आहे.गतवर्षी रायपूरमध्ये झालेल्या २७व्या अखिल भारतीय वन क्रीडा संमेलनामध्ये राज्याने आठवे स्थान पटकावले होते. यंदा मात्र विभागाने थेट चौथ्या क्रमांकावर झेप घेत उत्कृष्ट प्रगती दर्शवली. या यशात राज्यातील ४ वन प्रशिक्षण संस्था आणि २ वन अकादमींतील प्रशिक्षणार्थींचा मोठा वाटा असून त्यांनी मिळवलेल्या २७ पदकांमुळे महाराष्ट्राच्या पदकांत वाढ झाली. धावणे, लांबपल्ला, रिले, मॅरेथॉन, लांब उडी, रेस वॉक, भालालाफेक, भारोत्तोलन आणि पॉवरलिफ्टिंग अशा विविध प्रकारात प्रशिक्षणार्थ्यांनी ९ सुवर्ण, १० रौप्य आणि ८ कांस्य पदके पटकावली.
चंद्रपूर वन अकादमीने सर्वाधिक १० पदके जिकून आघाडी घेतली. शहापूर वन अकादमीने ६ पदके जिंकत दुसरा

### रोहितचा बीसीसीआय ला मेसेज, निवृत्तीच्या घोषणेनंतरही टी२० खेळण्यास तयार!

मुंबई-टीम इंडियाचा माजी कर्णधार रोहित शर्मा याने पुन्हा एकदा टी-२० क्रिकेट खेळण्याची तयारी दर्शवली आहे, याबाबतची माहिती रोहितने बीसीसीआय आणि निवड समितीला दिल्याचं वृत्तही समोर आलं आहे.
रोहित शर्माच्या या निर्णयामुळे तो लवकरच टी-२० फॉरमॅटमध्ये पुन्हा एकदा खेळताना दिसू शकतो. २०२७ चा वर्ल्ड कप खेळण्यासाठी रोहितने त्याच्या फिटनेसवर लक्ष केंद्रित केलं आहे, याचाच भाग म्हणून रोहितने त्याचं वजन कमालीचं कमी केलं आहे.स्वत:चा फिटनेस सिद्ध करण्यासाठी रोहितने विजय हजारे ट्रॉफी (वनडे) आणि सय्यद मुश्ताक अली टी-२० स्पर्धेत खेळण्याची तयारी दर्शवली आहे, याबद्दलचा मेसेज रोहितने बीसीसीआय आणि निवड समितीला केल्याचं वृत्त एनडीटीव्हीने दिलं आहे. रोहित जर भारतातल्या या दोन्ही स्थानिक स्पर्धा खेळायला तयार झाला तर दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या वनडे सीरिजनंतर तो मुंबईकडून खेळताना दिसेल. भारतामध्ये सध्या सय्यद मुश्ताक अली टी-२० स्पर्धा होत आहे, तर २४ डिसेंबरपासून विजय हजारे ट्रॉफीला सुरूवात होईल..

### 'शूटिंग स्टार्स २०२५' सेलिब्रिटी फुटबॉल सामन्याचे ५ डिसेंबर रोजी आयोजन

मुंबई-'शूटिंग स्टार्स २०२५' हा सेलिब्रिटी फुटबॉल सामना मुंबई येथे ५ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये टायगर श्रॉफ, सिद्धांत चतुर्वेदी यांसारखे अनेक लोकप्रिय कलाकार सहभागी होणार आहेत. हा उपक्रम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सुरु करण्यात आलेल्या प्रोजेक्ट महा-देवच्या अंतर्गत आयोजित केला जात आहे.
प्रोजेक्ट महा- देव हा महाराष्ट्रातील यु-१३ वयोगटासाठीचा पहिलाच असा राज्यस्तरीय उपक्रम आहे, ज्याचा उद्देश भारतीय संघासाठी भविष्याचे उत्तम फुटबॉलपटू तयार करणे हा आहे. २०३४ च्या ऋखक्रअ विश्वचषकासाठी भारताच्या संघात किमान पाच खेळाडू महाराष्ट्रातून असावेत, हे या उपक्रमाचे ध्येय आहे.
या उपक्रमाचे तीन मुख्य आधारस्तंभ आहेत. टॅलेंट आयडेंटिफिकेशन (प्रतिभा शोध): ग्रामीण आणि शहरी भागातील लहान खेळाडूंना शोधून त्यांना संधी देणे.

# वैभव सूर्यवंशीचे नाबाद १०८ धावांची वादळी खेळी!




## महाराष्ट्राच्या गोलंदाजीचे मोडले कंबरडे, केली

**नवी दिल्ली:** सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी २०२५ मध्ये सातत्याने अपेक्षेपेक्षा कमी कामगिरी केल्यामुळे युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीवर (तरळलहर्रीं डीू-रींरपीहळ) मोठ्या प्रमाणात टीका होत होती. सलग तीन सामन्यांत फॉर्म नसल्यामुळे अनेकांनी त्याच्या क्षमतेवर आणि निवडीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. मात्र, या सर्व टीकेला वैभव सूर्यवंशीने चौथ्या सामन्यात आपल्या बॅटनेच योग्य उत्तर दिले. महाराष्ट्राविरुद्ध मैदानात उतरताच वैभवने जबरदस्त शतकी खेळी साकारली. त्याने फक्त ५८ चेंडूंत हे झंझावाती शतक पूर्ण केले. वैभवच्या या शतकाची खास गोष्ट म्हणजे, त्याने षटकार मारत आपली शतकी धावसंख्या पूर्ण केली. त्याने आपल्या शतकात जितके षटकार मारले, तितकेच चौकारही ठोकले. या आक्रमक खेळीमुळे त्याने टीकाकारांची तोंडे बंद केली असून, संघात आपला फॉर्म परतल्याचे सिद्ध केले आहे. वैभव सूर्यवंशीची ही वादळी खेळी सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये सध्या चर्चेचा विषय बनली आहे.
६१ चेंडूंमध्ये ठोकल्या नाबाद १०८ धावा महाराष्ट्राविरुद्धच्या महत्त्वपूर्ण सामन्यात बिहार संघाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ३ गडी गमावून १७६ धावांचा टप्पा गाठला. या धावसंख्येत उपकर्णधार वैभव सूर्यवंशी (तरळल-हर्रीं डीूर्रीरपीहळ) याने केलेली एकहाती नाबाद १०८ धावांची खेळी सर्वात महत्त्वाची ठरली.

## ७ षटकार, ७ चौकार!

वैभवने केवळ ६१ चेंडूंमध्ये नाबाद १०८ धावा ठोकल्या. त्याने १७७ पेक्षा अधिक स्ट्राइक रेटने खेळलेल्या या इनिंगमध्ये ७ षटकार आणि ७ चौकार मारत आक्रमकतेचा परिचय दिला. ओपनर म्हणून मैदानात उतरलेल्या वैभवची बिपिन सौरभसोबत मोठी भागीदारी जमली नाही, तसेच त्यानंतर पीयूषसोबतही तो जास्त वेळ टिकू शकला नाही. मात्र, तिसऱ्या विकेटसाठी त्याने आकाश राज सोबत महत्त्वपूर्ण अर्धशतकी भागीदारी रचली. या भागीदारीमुळेच बिहार संघाने महाराष्ट्रासमोर एक चांगली आणि सन्मानजनक धावसंख्या उभी केली. वैभव सूर्यवंशीच्या उपकर्णधारपदाला साजेसा खेळ करत नाबाद १०८ धावा केल्यामुळे, संघाला आता सामन्यात चांगल्या स्थितीत राहण्याची संधी मिळाली आहे.
कारकिर्दीतील पहिलंच शतक
वैभवने १४ व्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर आकाश राज बाद झाल्यानंतर (जेव्हा बिहारचा स्कोर ३ बाद १०१ होता) धावांचा वेग मोठ्या प्रमाणावर वाढवला. या निर्णायक क्षणी त्याने हात मोकळे करत अत्यंत जलद गतीने अर्धशतक पूर्ण केले आणि त्याच धडाक्यात शतकाची उंबरठाही पार केली. विशेष म्हणजे, स्पर्धेतील पहिल्या तीन सामन्यांत मिळून केवळ ३२ धावा करणाऱ्या वैभव सूर्यवंशीने चौथ्या सामन्यात हे तडाखेबाज शतक झळकावले. यामुळे त्याच्या फॉर्मवर टीका करणाऱ्यांना त्याने आपल्या बॅटनेच योग्य प्रत्युत्तर दिले. डच-ढ स्पर्धेतील त्याच्या कारकिर्दीतले हे पहिलेच शतक ठरले असून, या खेळीमुळे त्याने निवडकर्त्यांना आपली क्षमता पुन्हा एकदा सिद्ध करून दाखवली आहे.
चरहरीरीहींर छरसरी झरीळीहरव एश्रशलींळेप : मतदान केंद्रांवर गर्दी! महाराष्ट्रात मतदानाच्या टक्केवारीत सकारात्मक वाढ; आतापर्यंत आकडे काय सांगतात?
महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी आज (मंगळवार) मतदान प्रक्रिया उत्साहात पार पडत आहे. या निमित्ताने सकाळपासूनच मतदारांमध्ये ...
१४ वर्षांच्या वैभव सूर्यवंशीच्या नावावर विश्वविक्रम-युवा क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशी याने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये (डच-ढ) महाराष्ट्राविरुद्ध शतक झळकावून केवळ एक सामना जिंकला नाही, तर जागतिक क्रिकेटच्या इतिहासात आपला ठसा उमटवला आहे! क्रिकेटच्या मैदानावर पाऊल ठेवल्यापासून तुफानी कामगिरी करणाऱ्या वैभवने आता इतिहास रचला आहे. तो वयाच्या अवघ्या १४ व्या वर्षी आणि फक्त १७ टी-२० सामन्यांमध्ये तीन टी-२० शतके झळकावणारा जगातील पहिला तरुण खेळाडू बनला आहे. क्रिकेटच्या इतिहासात कोणत्याही खेळाडूने इतक्या लहान वयात ही विक्रमी कामगिरी केलेली नाही. स्पर्धेतील पहिल्या तीन सामन्यांत अपेक्षेपेक्षा कमी कामगिरीमुळे वैभववर टीका झाली होती. मात्र, या टीकाकारांना आपल्या बॅटने उत्तर देत त्याने दमदार पुनरागमन केले आहे. हे शतक संघाचे मनोबल उंचावणारे असून, आगामी सामन्यांसाठीही तो तितकाच महत्त्वाचा ठरणार आहे.

# राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या आयोजनाचा खर्च अंदाजे पाच हजार कोटी

नवी दिल्ली : भारतात अहमदाबाद येथे २०३० मध्ये होणार्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या आयोजनाचा खर्च अंदाजे तीन ते पाच हजार कोटी रुपये असू शकतो, असा अंदाज आयोजन समितीने व्यक्त केला आहे. स्पर्धेच्या नियोजनात सहभागी असलेल्या एका विश्वासार्ह सूत्राने ही माहिती दिली. या स्पर्धेच्या आयोजनासाठी एकूण खर्च निश्चित करण्यासाठी अंदाज घेणे सुरू आहे. यापूर्वी २०१० मध्ये नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेवर वारेमाप खर्च करण्यात आला होता. त्यामुळे आयोजन पातळीवर अनेक वाद निर्माण झाले होते. त्यामुळे या सर्व घटनांचा अभ्यास करून या वेळी कामकाजाचा खर्च तीन ते पाच हजार कोटी इतका ठेवण्यात येणार आहे. अर्थात, यामध्ये पायाभूत सुविधांच्या बांधकामासाठी लागणार्या निधीचा समावेश नाही. यासाठी येणार्या खर्चाचा काही भाग हा शहर विकास विभाग हाताळणार असल्याची माहितीही या सूत्राने दिली.



पायाभूत सुविधा अंतर्गत होणार्या पायाभूत बांधकामाचा उपयोग खेळाच्या पलीकडे जाऊन केला जाणार आहे. यामुळेच हा खर्च खेळावर होणार्या खर्चात मोजला जाणार नाही. स्पर्धेसाठी नेमका किती खर्च येईल याचा अंदाज घेण्यासाठी आम्हाला काही वेळ लागेल. ही थोडी लांब प्रक्रिया असेल असे या सूत्राने सांगितले.यापूर्वीच्या नवी दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेवरील खर्च नियोजित अंदाजापेक्षा अधिक झाल्यामुळे सरकारी तिजोरीवर ७० हजार कोटी रुपयांचा ताण पडला होता. या वेळी ही चूक टाळण्यासाठी आयोजन समिती प्रयत्नशील आहे. पण, खर्चाचा नेमका अंदाज देण्यास गुजरात सरकारचे क्रीडा प्रधान सचिव अश्विनी कुमार यांनी नकार दिला. दिल्ली क्रीडा स्पर्धेत काय घडले यावर मी लक्ष केंद्रित करू शकत नाही. परंतु, या घटनांतून आम्ही घ्यायचा तो धडा घेतला आहे, असे ते म्हणाले. या स्पर्धेच्या आयोजन समितीमध्ये १२ ते १५ सदस्य असतील.



# कुलदीप यादवने मोडला शेन वॉर्नचा जागतिक विक्रम

रांची : भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात झालेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात भारतीय संघाने १७ धावांनी नाट्यमय विजय मिळवला. विराट कोहलीच्या शानदार शतकाने भारताचा डाव भक्कम केला आणि त्याला सामनावीराचा पुरस्कार मिळाला. मात्र, सामन्याचा खरा टर्निंग पॉइंट ठरला तो कुलदीप यादवच्या घातक फिरकी गोलंदाजीचा. कुलदीपने ४ विकेट्स घेत महान शेन वॉर्नचा वर्ल्ड रेकॉर्ड मोडला. भारताने प्रथम फलंदाजी करताना रोहित शर्मा आणि विराट कोहलीच्या १३६ धावांच्या भागीदारीच्या जोरावर ३४९ धावांचा डोंगर उभारला. प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिकेनेही जोरदार सुरुवात केली. मॅथ्यू ब्रिट्झके आणि मार्को यान्सन यांनी ९७ धावांची भागीदारी करून सामना आफ्रिकेकडे झुकवला होता. पण कुलदीप यादवने फक्त तीन चेंडूत दोन्ही फलंदाजांना बाद करत सामन्याची दिशा बदलली. त्याने १० षटकांत ६८ धावा देत ४ बळी घेतले. या चार बळींसह कुलदीपने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध चौथ्यांदा ४ विकेट्स घेण्याचा पराक्रम केला आहे.




# रोहित हो म्हणाला, मग तुला वेगळा नियम का? विराट टार्गेटवर, टीम इंडियात हाय व्होल्टेज ड्रामा!

मुंबई,२ डिसेंबर -विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्या भविष्यावरून भारतीय क्रिकेटमधले मतभेद वाढत चालले आहेत, त्यातच आता आणखी काही नाट्यमय घडामोडी घडल्या आहेत. कोहली आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्यातलं नातं बिघडलं आहे, कारण दोघांमध्ये भविष्यावरच्या मुद्द्यावरून मतभेद आहेत, असं वृत्त एनडीटीव्हीने दिलं आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार रोहित शर्माने आगामी विजय हजारे ट्रॉफीमध्ये खेळायला होकार दिला आहे, पण कोहलीने मात्र आपण स्थानिक स्पर्धेत खेळणार नसल्याचं स्पष्टपणे सांगितलं आहे.विजय हजारे ट्रॉफी (वनडे) मध्ये खेळण्यासाठी आपण तयार असल्याचं रोहित शर्माने निवड समितीला सांगितलं आहे. एवढंच नाही तर त्याने सय्यद मुश्ताक अली टी-२० स्पर्धेसाठीही स्वत:ला उपलब्ध करून दिलं आहे. दुसरीकडे विराट कोहली 'जास्त तयारी' करण्याच्या बाजूने नसल्याचं सांगण्यात येत आहे. कोहलीच्या या भूमिकेमुळे बीसीसीआयसमोर अडचण निर्माण झाली आहे, कारण बीसीसीआय कोणत्याच खेळाडूला सूट द्यायला तयार नाही. विराट अपवाद कसा? 'समस्या विजय हजारे ट्रॉफीसंबंधी आहे. कोहली खेळू इच्छित नाही. जेव्हा रोहित शर्माही खेळायला तयार असतो, तेव्हा एका खेळाडूला अपवाद कसा असू शकतो? आम्ही इतर खेळाडूंना काय सांगायचं? की तो इतरांपेक्षा वेगळा आहे', असं बीसीसीआयमधल्या सूत्राने सांगितलं आहे. बीसीसीआय, निवड समिती आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी सातत्याने खेळाडूंना देशांतर्गत क्रिकेट खेळण्यासाठी प्रोत्साहित केले आहे. खरं तर, ऑस्ट्रेलिया दौऱ्यातल्या टेस्ट सीरिजमधील खराब कामगिरीनंतर रोहित आणि विराट यांनी बीसीसीआयच्या आग्रहावरून रणजी ट्रॉफी खेळले.
रांचीमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या वनडेमध्ये विराट कोहलीने खणखणीत शतक झळकावले. सामन्यानंतरच्या प्रेझेन्टेशन सेरेमनीमध्ये विराटने, आपण कधीही अति-तयारीवर विश्वास ठेवला नाही. माझं सर्व क्रिकेट मानसिक आहे, मी शारीरिकदृष्ट्या कठोर परिश्रम करतो, जोपर्यंत माझी फिटनेस लेव्हल चांगली आहे आणि मला बॅटिंग करताना चांगलं वाटत असतं', असं विराट म्हणाला.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार कोहली आणि गंभीर यांच्यातील वाढता तणाव कमी करण्यासाठी बीसीसीआयने बुधवारी निवड समिती सदस्य प्रग्यान ओ-झाला रायपूरला पाठवले आहे. प्रग्यान ओझा आणि विराट कोहली यांच्यात संभाषण सुरू असल्याचा एक व्हिडिओही समोर आला आहे, या व्हिडिओमध्ये दोघंही गांभिर्याने चर्चा करताना दिसत आहेत.

# पुढील होणारे २०२६ मधील आयपीएलचे सामने बंगळुरूमध्ये होणार नाहीत?

नवी दिल्ली : आयपीएलचे सामने बंगळूरुच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियममध्ये होतील की नाही, हे अजून निश्चित झालेले नाही. स्टेडियममध्ये पुन्हा सामने आयोजित करण्यापूर्वी तज्ञांकडून सुरक्षा मंजुरी आणि फिटनेस चाचणी दोन्ही पास करणे आवश्यक असेल. महिला विश्वचषकाच्या वेळी न्यायमूर्ती डी'कुन्हा समितीनेही या मैदानास मोठ्या आयोजनांसाठी असुरक्षित ठरवले होते. या वर्षी आरसीबीने पहिली आयपीएल ट्रॉफी जिंकल्यानंतर स्टेडियममध्ये विजय मिरवणूक काढण्यात आली होती. परंतु, स्टेडियमबाहेर प्रचंड गर्दीमुळे चेंगराचेंगरी झाली, ज्यात ११ लोकांचा मृत्यू झाला आणि ५० पेक्षा जास्त लोक जखमी झाले होते.
स्टेडियममध्ये ४ जून रोजी झालेल्या चेंगराचेंगरीनंतर या घटनेच्या चौकशीसाठी न्यायमूर्ती जॉन मायकल डी'कुन्हा यांच्या नेतृत्वाखाली एक समिती स्थापन करण्यात आली होती. ज्याच्या अहवालात स्टेडियमशी संबंधित अनेक उणिवा समोर आल्या. अहवालात असे म्हटले होते की, स्टेडियमची सध्याची रचना मोठ्या कार्यक्रमांसाठी सुरक्षित नाही, एम. चिन्नास्वामी स्टेडियममध्ये प्रवेश आणि बाहेर पडण्यासाठी पुरेसे दरवाजे नाहीत, आणीबाणीच्या परिस्थितीत बाहेर पडण्यासाठी आंतरराष्ट्रीय मानकांनुसार नियोजन उपलब्ध नाही, स्टेडियमच्या आसपासचे रस्ते खूप गर्दीचे आहेत, ज्यामुळे आणीबाणीच्या परिस्थितीत हालचाल करणे कठीण होते, पार्किंगची जागा खूप कमी आहे, ज्यामुळे वाहतूक आणि गर्दीचे नियंत्रण बिघडते.
या अहवालानंतर आयसीसी महिला वर्ल्ड कप २०२५ चे सामने देखील बंगळुरूहून नवी मुंबईत हलवण्यात आले. तसेच, देशांतर्गत टी-२० लीग महाराजा टी-२० ट्रॉफी देखील बंगळुरूऐवजी म्हैसूरमध्ये हलवावी लागली होती.आता मोठा प्रश्न हा आहे की, आयपीएल २०२६ मध्ये बंगळुरूला आपले घरचे सामने खेळायला मिळतील का? कर्नाटक सरकारने चिन्नास्वामी स्टेडियमला फिटनेस चाचणी उत्तीर्ण करण्याचा आदेश दिला आहे. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने कर्नाटक राज्य क्रिकेट संघाला नोटीस पाठवली आहे.
स्टेडियममध्ये आयपीएल सामने तेव्हाच होऊ शकतील, जेव्हा तज्ञ त्याची रचना पूर्णपणे सुरक्षित घोषित करतील. जर चिन्नास्वामी स्टेडियम फिटनेस चाचणीत उत्तीर्ण झाले नाही, तर आरसीबीला आपले घरचे सामने बंगळुरूबाहेर खेळावे लागतील.आयपीएल २०२६ची सुरुवात १५ मार्चपासून होण्याची शक्यता आहे, तर अंतिम सामना ३१ मे रोजी खेळला जाऊ शकतो. त्यापूर्वी १६ डिसेंबर रोजी अबू धाबीमध्ये मिनी लिलाव आयोजित केला जाईल.



## दयानंद शिक्षण संस्था परिसरात क्रीडाज्योत मशाल रॅलीचे भव्य स्वागत



**लातूर/प्रतिनिधी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे मा.कुलगुरु डॉ.मनोहर चासकर, प्र.कुलगुरु, डॉ. अशोक महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे ७वा. महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव २०२५ दि. ४ ते ८ डिसेंबर २०२५ दरम्यान संपन्न होत आहे. या महोत्सवाच्या जनजागृती करिता विद्यापीठातुन रॅली लातूर जिल्ह्यातील दयानंद शिक्षण संस्थेत आली असता या भव्य रॅलीचे दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, विज्ञान महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिध्देश्वर बेल्लाळे, दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. गणेश लहाने, समन्वयक डॉ. संतोष पाटील यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारोती गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार सदस्य डॉ. केशव अलगुले, जिल्हा समन्वयक डॉ. बालाजी होकरणे यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन केले. ही रॅली दयानंद मुख्य प्रवेशद्वारापासुन सर्व महाविद्यालयांना भेट देत क्रीडा महोत्सवाची जनजागृती करण्यात आली. समाजातील तरुणांनी जागरुक राहुन आरोग्यदायी, व्यसनमुक्त आणि राष्ट्र निर्मितीत सक्रीय योगदान द्यावे. तसेच नारीचा सन्मान व्हावा व राष्ट्राचा अभिमान वाढावा, स्त्री आत्मनिर्भर बनावी, देश प्रगतीपथावर जावा या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेतील प्रा.डॉ. वाघमारे, डॉ. शर्मा, डॉ. कोल्हे, प्रा. राजकुमार मोरे व बहुसंख्येने विद्यार्थी व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी साधला नागरिकांशी संवाद

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी मंगळवार दि.०२ डिसेंबर रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकारी,काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी,नागरिक यांच्या भेटी घेत त्यांच्याशी संवाद साधला.अडीअडचणी समस्या समजून घेऊन त्यांच्या निमंत्रनाचा तसेच निवेदनाचा स्वीकार करीत पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी संबंधिताना सूचना केल्या.

यावेळी लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे,विलास को-ऑपरेटिव बँकेचे व्हा.चेअरमन समद पटेल,ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख,लातूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष उमेश बेद्रे,डॉ.अशोक आरदवाड,डॉ. मुकुंद भिसे,सुधीर गोजमगुंडे, सुदर्शन बिराजदार, संजय निलेगावकर,अमर राजपूत,व्यंकटेश पुरी, आर.बी.पाटील,अक्षय शहरकर,पिराजी साठे,बंकट पवार, अभिषेक पतंगे, मोहन सुरवसे, विवेक गवळी, शिवकांत सारगे,बादल शेख,डॉ. मंजुषा कुलकर्णी, डॉ.व्यंकट येलाले, डॉ. अभय ढगे, सचिन सुरवसे, आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते,नागरिक उपस्थित होते.

# मुंडे साहेबांनी मान्यता दिलेल्या शाळेकडे रमेशआप्पा कधीच दुर्लक्ष करणार नाहीत

## पानगावच्या उर्दू शाळेत ऋषिकेश कराड यांच्या हस्ते शैक्षणिक साहित्याचे वाटप

**लातूर/प्रतिनिधी :** रेणापूर तालुक्यात पर्यायाने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांचे वारसदार म्हणून रमेशआप्पा कराड साहेब काम करीत आहेत. त्यामुळे या भागाच्या सर्वांगीण विकासाबरोबरच स्व. मुंडे साहेबांनी मान्यता दिलेल्या पानगावच्या उर्दू शाळेकडे कधीच दुर्लक्ष करणार नाहीत या शाळेच्या प्रगतीसाठी निश्चितपणे मदत केली अशी ग्वाही भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष युवा नेते मा. ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी दिली.

रेणापूर तालुक्यातील पानगाव येथील लोकसेवा संस्था संचलित मौलाना अब्दुल कलाम आझाद उर्दू शाळेतील विद्यार्थ्यांना संस्थेचे



उपाध्यक्ष अब्दुल कादर महेमूदमिया आणि सहसचिव रफिक रहीमखा पठाण यांच्या वतीने भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांच्या हस्ते शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक व्यंकटराव आनामे मामा, माजी सरपंच सुकेश भंडारे, भाजयुमोचे मंडल अध्यक्ष अमरसिंह चव्हाण, खैसरउद्दीन काजी, आयुब मणियार, शब्बीर शेख, उपसरपंच रमाकांत वाघमारे, माजी उपसरपंच पैगंबर शेख, संस्थेचे अब्दुल कादर, रफिक पठाण, मुअ शबाना अंजुम खुर्शीद यांच्यासह पालक, विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मौलाना अब्दुल कलाम उर्दू शाळेत विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे गुणवत्तापूर्वक शिक्षण देण्यात येत असल्याने दरवर्षी विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ होत असल्याचे समाधान व्यक्त करून युवा नेते ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, या संस्थेच्या ज्या काही अडचणी असतील त्या निश्चितपणे लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड साहेब यांच्या माध्यमातून त्याची निश्चितपणे सोडवणूक केली जाईल. विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी शिक्षकांनी मेहनत घेऊन विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती साधावी असे बोलून दाखवले.

प्रारंभी संस्थेचे संस्थापक आयुब मणियार यांनी आपल्या प्रास्ताविकातून संस्थेच्या कामकाजाचा आढावा दिला. यावेळी सुकेश भंडारे, जलील आत्तार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेंद्र उकंडे यांनी केले तर शेवटी भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे शहराध्यक्ष इस्माईल मणियार यांनी आभार मानले. या कार्यक्रमास डॉ. एस. आर. शेख, मारुती गालफाडे, गोविंद नरहरे, शफिक पठाण, इस्माईल मणियार, ज्ञानोबा गुडे, शिवाजी जाधव, महादू फुले, दिगंबर येडले, समशेर पठाण, शेख इलाई, इनुस मणियार, जुबेर मणियार, राहुल मोटाडे यांच्यासह उर्दू शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनी पालक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## केअर रेटिंग्जकडून महापारेषणला ‘AA-’; आर्थिक विश्वसनीयतेत मोठी वाढ, ग्रिड क्षमता आणि व्यवस्थापनाला मोठी मान्यता

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने (महापारेषण) आणखी एक उल्लेखनीय यश मिळवले आहे. प्रतिष्ठित केअर रेटिंग्ज लिमिटेडने कंपनीचा क्रेडिट रेटिंग A+ वरून AA- पर्यंत उंचावला आहे. या सुधारित रेटिंगमुळे महापारेषणची आर्थिक विश्र्वासार्हता अधिक बळकट झाली असून आगामी काळात अनुकूल अटींवर गुंतवणूक उभारणीस मदत होणार आहे. महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांच्या नेतृत्वाखाली आणि संचालक (वित्त) श्रीमती तृप्ती मुधोळकर यांच्या मार्गदर्शनाखाली वित्त व लेखा विभागाने ही चमकदार कामगिरी केली आहे.



महापारेषणची मजबूत आर्थिक कामगिरी, उत्कृष्ट वीजवहन व्यवस्थापन तसेच उच्च कार्यक्षमतेच्या ग्रिड क्षमतेमुळे हे यश मिळाल्याचे केअर रेटिंग्ज लिमिटेडने कळविले आहे. चालू वर्षात कंपनीच्या कार्यक्षमतेत मोठी सुधारणा झाली आहे. मजबूत कॅशफ्लो, कमी कर्जभार आणि ९९% पेक्षा जास्त प्रणाली उपलब्धता ही कंपनीची ठळक वैशिष्ट्ये ठरली आहेत.

महापारेषणने राज्यातील वीजवहन प्रणालीचा दर्जा उंचावण्यासाठी मोठ्या प्रमाणात आधुनिकीकरण, उपकेंद्राचे सक्षमीकरण तसेच भविष्यातील ऊर्जे साठी ग्रिड क्षमतेचा विस्तार अशा महत्त्वांच्या उपक्रमांना गती दिली आहे.

केअर रेटिंग्ज लिमिटेडने महापारेषणचे दीर्घकालीन महसूल स्थैर्य, मजबूत कार्यप्रणाली, शासकीय मालकी आणि महाराष्ट्राच्या ऊर्जा पायाभूत सुविधांतील महत्त्वपूर्ण भूमिकेचा विशेष उल्लेख केला आहे. महापारेषणच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## इस्त्रोचे अध्यक्ष डॉ. नारायणन यांच्या हस्ते लातूरचे विकास उगले यांना पीएचडी प्रदान

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील रहिवाशी विकास वसंतराव उगले यांनी यांत्रिकी अभियांत्रिकी (मेकॅनिकल इंजिनिअरिंग ) या विषयात पीएच. डी. मिळवली आहे.

ही पदवी त्यांना व्हीलटेक रंगराजन डॉ. सगुंथला आर आणि पी इन्स्टिट्यूट ऑफ टेकक्नॉलॉजी युनिव्हर्सिटी चेन्नई येथील पदवीदान समारंभात इस्त्रोचे अध्यक्ष डॉ. नारायणन यांच्या हस्ते विकास वसंतराव उगले यांना प्रदान करण्यात आली. याप्रसंगी संस्थेचे कुलगुरू तसेच विविध अधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. विकास उगले यांनी आपल्या संशोधनात मार्गदर्शन करणाऱ्या सर्वांचे आभार मानले आहेत.

विकास उगले यांनी संशोधन क्षेत्रात विशेष कामगिरी बजावली असून त्यांनी विविध तंत्रज्ञाशी संबधित प्रकल्पावर कार्य केलेले आहे. त्यांनी यांत्रिकी, अभियांत्रिकी, मशीन लर्निंग या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिलेले आहे. विकास उगले हे सध्या पुणे




येथील आंतरराष्ट्रीय कंपनीमध्ये सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून कार्यरत आहेत.त्यांनी विविध शोध विषयावर संशोधन करून देश आणि जागतिक स्तरावर संशोधन क्षेत्रात मोलाचे योगदान दिलेले आहे. विकास उगले यांनी आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये आपली संशोधन पत्रे सादर केली असून त्यांना मान्यता प्राप्त झाली आहे. विकास उगले यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण लातूर येथेच झाले आहे. त्यानंतरचे यांत्रिकी अभियांत्रिकीचे शिक्षण पुणे येथील वाडिया कॉलेज येथे झाले.त्यानंतर थर्मल अभियांत्रिकीत एमटेक पर्यंतचे शिक्षण मुंबई येथे झाले. आणि आता त्यांनी वेलतेक डॉ. रंगराजन सगुंथला संशोधन विकास विज्ञान आणि तंत्रज्ञान संस्था चेन्नई येथून पीएचडी पदवी प्राप्त केली आहे. विकास उगले हे एका स्वातंत्र्य सैनिकांचे नातू असून त्यांचे वडील आणि भाऊ विधिज्ञ आहेत. त्यांच्या या यशाबद्दल लातूरचे माजी खासदार, माजी नगराध्यक्ष व माजी कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे, ॲड. सुधाकर आवाड, ॲड. भगवानराव साळुंके, नाशिकचे न्या. अमर काळे, सिजीएम न्या. इगतपुरी, अंजली काळे, मुंबई हायकोर्टाचे ॲड. वैभव उगले, मुंबई येथील डीवायएसपी राजेंद्र उगले, डॉ. स्वप्नील व्यवहारे, डॉ. सूर्या व्यवहारे, नांदेडचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमप, ॲड. श्रीमंत भोसले, ॲड. शिवाजीराव कानवटे, ॲड. डी. पी. शिरूरे, ॲड. चिखलीकर, ॲड. एस. पी. लामतुरे, ॲड. पी. आर. केदार, ॲड. कुळकर्णी, ॲड. चौधरी, ॲड. बनसोडे, डॉ. धनंजय गिरी आदी मान्यवरांनी विकास उगले यांचे अभिनंदन केले आहे.

# कृषीपंपांना कॅपॅसिटर बसवा, रोहीत्रे व वीजयंत्रणेची हानी टाळा, महावितरणचे शेतकऱ्यांना आवाहन

**धाराशिव/प्रतिनिधी :** रब्बीचा हंगाम सुरू झाला की कृषीपंपाचा वापर वाढत जातो. अनेकदा रोहीत्रांसोबतच पाण्याची मोटर जळाल्याच्या तक्रारी वाढत जातात. विजेचा भार नियंत्रीत करणारे कॅपॅसीटरचा वापर फार कमी शेतकरी करतात त्याचबरोबर ॲटोस्विचचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. परिणामी अचानक विजेचा भार वाढल्याने वीज यंत्रणे सोबतच पाण्याची मोटर जळण्याचे प्रमाण वाढते त्यामुळे शेतकऱ्यांनी कृषीपंपाचा वापर योग्य ते कॅपॅसीटर लावूनच करावा असे आवाहन महावितरणने केले आहे.

वीजपुरवठा सुरू झाल्यानंतर कृषिपंप तत्काळ सुरू करण्याच्या उद्देशाने बहूतांश शेतकरी कृषिपंपाना ऑटोस्विच बसविले आहेत. त्यामुळे परिसरातील अनेक कृषिपंप एकाच वेळी सुरू होऊन रोहित्रावरील भार अचानक वाढतो. परिणामी रोहित्र जळणे,





वीजवाहिन्या बंद वा नादुरुस्त होणे तसेच पाण्याची मोटर जळन्याचे प्रमाण वाढते. यातून होणारी गैरसोय व नुकसान होवू नये तसेच सुरळीत व योग्य दाबाचा वीजपुरवठा मिळावा, यासाठी शेतकऱ्यांनी कृषिपंपांना ऑटोस्विचऐवजी कॅपॅसिटर बसवावेत.

कॅपॅसिटरची गरज का? प्रत्येक कृषिपंपास क्षमतेनुसार कॅपॅसिटर बसविणे हा रोहित्र जळणे वा नादुरुस्त होण्याचे प्रमाण आटोक्यात आणण्यासाठी एक सोपा उपाय आहे. कॅपॅसिटरमुळे योग्य दाबाचा वीजपुरवठा होतो, रोहित्र जळाल्यास वा नादुरुस्त झाल्यास दुरुस्ती कालावधीतील खंडित वीजपुरवठा या समस्या सुटण्यास मदत होते. मात्र बहुतांश शेतकऱ्यांनी कृषिपंपास कॅपॅसिटर बसविलेले नाहीत. बसविलेल्यांपैकी काहींचे बंद तर काहींनी थेट जोडणी केली आहे. त्यामुळे ज्यांनी कॅपॅसिटर बसविले नाहीत त्यांनी ते बसवून घ्यावेत आणि कॅपॅसिटर बंद किंवा थेट जोडणी असल्यास ते दुरुस्त करून घ्यावेत. कृषी क्षेत्रातील कार्यक्षम ऊर्जा वापरात कॅपॅसिटर हे उपकरण महत्त्वाचे आहे. कृषिपंपास कॅपॅसिटर बसविल्यामुळे विद्युत केबल जळण्याचे प्रमाण कमी होते. योग्य विद्युतदाब, केव्हीए मागणी, वीज वापरात बचत आदी फायदे होतात. पुरेशा दाबाने वीज पुरवठा मिळतो, कृषिपंप जळण्याचे प्रमाण कमी होते. तसेच रोहित्रांवरील भार ३० टक्क्यांने कमी होऊन रोहित्र नादुरुस्तीचे व जळण्याचेही प्रमाणही कमी होते. यामुळे शेतकऱ्यांचे होणारे संभाव्य आर्थिक नुकसान टाळता येते. योग्य दाबाचा, अखंडित व सुरळीत वीजपुरवठा मिळतो. या सर्वांचा लाभ शेतकऱ्यांना होणार असल्यामुळे त्यांनी कॅपॅसिटरचा वापर नचुकता करावा.

ऑटोस्विचचा वापर टाळावा

राज्यात ४५ लाखांहून अधिक कृषिपंपधारक शेतकरी आहेत. महावितरणकडून शेतकऱ्यांना दिवसा व रात्री अशा चक्राकार पद्धतीने वीजपुरवठा करण्यात येतो. रात्रीच्या वेळेत वीजपुरवठा सुरू झाल्यानंतर शेतात जाऊन कृषिपंप चालू करण्याचा त्रास वाचवण्यासाठी राज्यात अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी कृषिपंपांना ऑटोस्विच लावले असल्याचे दिसून येते. त्यामुळे वीज येताच कृषिपंप आपोआप चालू होतो. परिणामी रोहित्रांवरील भार एकाच वेळी वाढत असल्याने रोहित्र जळण्याचे किंवा नादुरुस्त होण्याचे प्रमाण वाढत आहे. ऐन हंगामात रोहित्र जळाल्यास त्याची झळ शेतकऱ्यांनाही सोसावी लागते. हे टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी कृषिपंपांना ऑटोस्विच लावू नये तसेच इतर शेतकऱ्यांनी ते लावले असल्यास त्वरीत काढून टाकावेत असे आवाहन महावितरणने केले आहे.

## महात्मा ज्योतीबा फुले यांना अभिवादन




मागासवर्गीय सेवानिवृत्त कर्मचारी संघ शाखा धाराशिवच्या वतीने महान समाजसुधारक महात्मा ज्योतीबा फुले यांच्या स्मृती दिनानिमित्त धाराशिव येथील महात्मा फुले चौकात महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्प वाहून त्यांना त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. यावेळी संघटनेचे अरुण बनसोडे, प्रभाकर बनसोडे, राजेंद्र धावारे, विजय गायकवाड, अशोक बनसोडे, बाळासाहेब माने इत्यादी उपस्थित होते.

## सोलापूर-अनकापल्ली साप्ताहिक विशेष गाड्या अतिरिक्त ८ फेऱ्यांसाठी सुरू राहणार

**सोलापूर/प्रतिनिधी :** खाली दिलेल्या तपशीलांनुसार सोलापूर आणि अनकापल्ली दरम्यान धावणाऱ्या विशेष गाड्यांच्या सेवा रेल्वे सुरू ठेवणार आहे:

सोलापूर-अनकापल्ली साप्ताहिक विशेष गाड्या (८ फेऱ्या)

- ट्रेन क्रमांक ०१४७७ सोलापूर-अनकापल्ली साप्ताहिक विशेष गाड्या २८.११.२०२५ पर्यंत चालवण्याची सूचना देण्यात आली आहे, आता ५.१२.२०२५ ते २६.१२.२०२५ पर्यंत दर शुक्रवारी चालवण्यात येणार आहेत. (४ फेऱ्या)




- ट्रेन क्रमांक ०१४७८ अनकापल्ली-सोलापूर साप्ताहिक विशेष गाड्या २९.११.२०२५ पर्यंत चालवण्याची सूचना देण्यात आली आहे, आता दर शनिवारी ६.१२.२०२५ ते २७.१२.२०२५ पर्यंत चालवण्यात येणार आहेत. (४ फेऱ्या)

वरील गाड्यांच्या रचनेत आणि थांब्यात कोणताही बदल होणार नाही.

आरक्षण आणि बुकिंग: विशेष गाड्यांच्या ०१४७७/०१४७८ च्या सततच्या फेऱ्यांसाठी विशेष शुल्कासह आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या वेबसाइटवर उघडेल.

अनारक्षित डब्यांसाठी बुकिंग स्थानकांवर बुकिंग काउंटर आणि णढड ॲपद्वारे देखील करता येते.

या विशेष गाड्यांच्या तपशीलवार वेळा आणि थांब्यांसाठी, कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा NTES ॲप डाउनलोड करा.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार निवडणुका रद्द ; माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर

**निलंगा/अयुब बागवान :** निवडणूक आयोगाच्या आदेशाने निलंगा नगरपालिकेची निवडणूक स्थगित केली असताना निलंगा शहर बंद ठेवून व्यापाऱ्यांना वेठीस धरणे चुकीचे असल्याचे माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर पत्रकार परिषदेत म्हणाले.

निलंगा नगरपालिकेची निवडणूक स्थगित केली आहे. यावरूनच माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांची मंगळवारी सकाळी दि. २ रोजी सकाळी १० वा वाजता त्यांच्या निवासस्थानी पत्रकार परिषद आयोजित केली होती. या पत्रकार परिषदेत बोलताना, विरोधक माझ्यावरती कितीही बोलू द्या मी त्यांना महत्त्व देत नाही परंतु आयोगाच्या आदेशानुसार निवडणुका रद्द हे पुन्हा एकाच्या सांगण्यावरून रद्द झाल्या नाहीत ते जाणीवपूर्वक जनतेत संभ्रम निर्माण करत आहेत व आज निलंगा बंद ठेवून निलंगातील सामान्य जनतेसह व्यापाऱ्यांना वेठीस धरण्याचे काम करत आहेत.

आता आमच्या नगरपालिका निवडणुकीच्या वचननाम्यामध्ये आता आणखी एक वचनाम्याची भर टाकली असून तसा ठराव घेऊन आमची नगरपालिका कोणत्याही बंदला समर्थन देणार नाही व व्यापाऱ्याचे नुकसान करणार नाही. ही जनता तुम्हाला माफ करणार नाही येणाऱ्या वीस तारखेला तुम्ही सामान्य नागरिकासह व्यापाऱ्याचे केलेले नुकसान नक्कीच मतदान रूपाने भरून काढतील असा मला विश्वास आहे. दररोजची उपजीविका असणाऱ्या सामान्य नागरिकांना मात्र याचा मोठ्या प्रमाणात फटका बसला आहे. सर्वांना माहित आहे की निवडणूक आयोग हे स्वायत्त संस्था आहे त्यामुळे ते स्वतः निर्णय घेतात. या निर्णयावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी नाराजी व्यक्त करीत चुकीचे घडल्याचे सांगितले व महाराष्ट्रात पहिल्यांदाच २४ ठिकाणी नगराध्यक्षपद व २०४ प्रभागातील निवडणुका या रद्द झाले आहेत. २८८ आमदारांपैकी निलंग्याच्या आमदाराने फोन करून सांगितले आम्ही निवडणुकीसाठी सज्ज आहोत परंतु याचे विरोधकांनी निरेटिव्ह जनतेमध्ये पसरवले या अगोदरही काँग्रेसने मुस्लिम व इतर समाजांना भाजप विरोधात चुकीचे निरेटिव्ह पसरवले होते परंतु जनता कसल्याही भूलथापांना बळी पडणार नाही जनतेला कोणी मूर्ख समजत असतील परंतु तेच असतील अशी खरमरीत टीका केली. या पत्रकार परिषदेस माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे वीरभद्र स्वामी आदींची उपस्थिती होती..



## कालवा स्वच्छता, गाळ काढण्याच्या कामासाठी अशासकीय संस्थांनी अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** जलसंपदा विभागाच्या २ नोव्हेंबर २०१८ आणि २५ फेब्रुवारी २०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार लातूर पाटबंधारे विभाग क्रमांक २ अंतर्गत तिरू मध्यम प्रकल्प, घारणी मध्यम प्रकल्प, मोघा प्रकल्प, भुतेकरवाडी प्रकल्प इत्यादी प्रकल्पावरील कालवा स्वच्छता कामे, कालव्यातील गाळ काढणे व सिंचनासाठी आवश्यक कामे करण्यासाठी लातूर जिल्ह्यातील पात्र अशासकीय संस्था (एनजीओ) यांनी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या कामाची सविस्तर माहिती व नियोजनाची माहिती लातूर पाटबंधारे विभाग क्रमांक २ या कार्यालयात उपलब्ध आहे. शासन निर्णयातील कार्यपद्धतीनुसार काम करण्यास इच्छुक अशासकीय संस्थांनी कार्यालयाकडे ८ डिसेंबर २०२५ पर्यंत लेखी अर्ज करावेत, असे आवाहन कार्यकारी अभियंता रो. सु. जगताप यांनी केले आहे.

## एकवीस ..

निवडणूक निकाल
पुढारी मंडळी बोले
आठव येई प्रश्नांची
जागृत सगळे झाले

निवडणूक सुसंपन्न
विषय सगळे बदले
सामान्यजन पिडले
आता साहेब वदले

बळीराजा बांधावर
आताअनेक जमले
थुंकी बोटावर फिरे
सहजकसले जमले

निवडणूकधामधुम
किती बिचारे दमले
सत्तामिळेल का हो
स्वप्न रंजनात रमले

लक्षआता एकवीस
आधी रेखा जुमले
निकाललागल्यावर
पुन्हा होणार हमले

झाली काआठवण
विचारता ते नरमले
कर्तव्यकळे आपले
रे तेंव्हा नेते शरमले

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

## दयानंद कला महाविद्यालयात फ्लॅश-मॉबद्वारे एड्स जनजागृती कार्यक्रम

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, लातूर तसेच आयसीटीसी२, वि.दे.शा.व.म.लातूर तसेच महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने एड्स जनजागृतीसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम दयानंद कला महाविद्यालयात उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात फ्लॅश-मॉब, नृत्य आणि लघुनाट्य (ड्रामा) यांच्या माध्यमातून एड्सबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलात्मक प्रदर्शनातून एड्स प्रतिबंध, सुरक्षित वर्तन, उपचाराची उपलब्धता आणि हेल्पलाइन सेवा याबाबत प्रभावी संदेश दिला.



हा फ्लॅश मॉब दयानंद शिक्षण संस्थेच्या परिसरात व दयानंद शिक्षण संस्थेच्या मुख्य द्वारासमोर सादर करण्यात आला. कार्यक्रमाला दयानंद कला महाविद्यालयाचे माननीय प्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड, उपप्राचार्य अंजली जोशी, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, परवेक्षक प्रशांत दीक्षित, विभागप्रमुख प्रा. डॉ. संतोष पाटील, तसेच एन.एस.एस. विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुभाष कदम यांची प्रमुख उपस्थिती लाभली. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवर्ग आणि विद्यार्थी मोठ्या उत्साहाने मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या या सृजनशील उपक्रमाला उपस्थित सर्वांनी मोठी दाद दिली.

## सहकार मंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त महारक्तदान शिबिराचे आयोजन

### काकी फाउंडेशन चा पुढाकार: अविनाश जाधव, सुरज पाटील यांची माहिती

**चाकूर/अजगर मचकुरी :** येथील काकी प्रतिष्ठानच्या वतीने राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त प्रती वर्षाप्रमाणे याही वर्षी ५ डिसेंबर रोजी शिरूर ताजबंद येथील इंद्रायणी निवासस्थानी महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या महारक्तदान शिबिरात रक्तदान करणाऱ्या व्यक्तीचा वैयक्तिक ५ लाख रुपयाचा अपघाती विमा काकी फाउंडेशनच्या वतीने काढण्यात येणार असल्याची माहिती सिद्धी शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीजचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश जाधव व शिरूर ताजबंदचे उपसरपंच सुरज पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकार द्वारे दिली आहे.






लातूर जिल्ह्यातील सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्यावर प्रेम करणाऱ्या तमाम नागरिकांनी या रक्तदान शिबिरात सहभाग नोंदवावा असे आवाहन सिद्धी शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीजचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश जाधव व शिरूर ताजबंद चे उपसरपंच सुरज पाटील यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## ९ डिसेंबर पर्यंत दिव्यांग सप्ताह साजरा होणार

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा परिषदेच्या दिव्यांग सक्षमीकरण विभागाअंतर्गत जागतिक दिव्यांग दिन साजरा होणार आहे. या अंतर्गत बुधवारी शहरातील रूक्मिणी मंगल कार्यालयात दिव्यांग मुलां-मुलींच्या सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे राहतील.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, महानगरपालिकेच्या आयुक्त, मानसी मीना, जिल्हा पोलीस अधिक्षक अमोल तांबे, केंद्रीय सल्लगार समितीचे सदस्य सुरेश पाटील, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, समाज कल्याणचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी अप्पासाहेब चाटे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या सांस्कृतिक स्पर्धेत जिल्ह्यातील मुकबधिर, अस्थिव्यंग, अंध, गतिमंद व बहुविकलांग प्रवर्गातील दिव्यांग विद्यार्थ्यांचा समावेश असणार आहे.

दिव्यांगांच्या जिल्हास्तरीय सांस्कृतिक स्पर्धेसाठी व त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी जिल्ह्यातील सर्व दिव्यांग बांधवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, समाज कल्याणचे सहायक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

०३ ते ०९ डिसेंबर दरम्यान विविध कार्यक्रम घेवून दिव्यांगांना सक्षम बनविण्यासाठी दिव्यांग सप्ताह साजरा केला जाणार आहे. या सप्ताह अंतर्गत विविध कार्यक्रम घेण्यात येणार असून भौतिक, वाचा व भाषा उपचार पध्दतीसह दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा, युडीआयडी नोंदणी, कृत्रिम अवयव शिबीर, आयुष्मान भारत व वैश्विक कार्ड ई-केवायसी शिबीरही घेण्यात येणार आहेत, अशी माहिती जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांनी दिली.

## शिवपूर ग्रामपंचायत कार्यालयात 'संविधान दिन' उत्साहात साजरा; अधिकारी व नागरिकांची उपस्थिती

**शिवपुर/अजगर मचकुरी :** भारतीय संविधानाचे महत्त्व जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी शिवपूर ग्रामपंचायत कार्यालयात आज (दि. २६ नोव्हेंबर) संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ग्रामविकास अधिकारी पूजा वाघमारे मॅडम यांच्यासह उपसरपंच आणि गावातील प्रमुख मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे (झीशरालश्रश) सामूहिक वाचन करून करण्यात आली. ग्रामविकास अधिकारी पूजा वाघमारे मॅडम यांनी उपस्थित नागरिकांना संविधान दिनाचे महत्त्व सविस्तरपणे समजावून सांगितले. त्यांनी देशाच्या लोकशाही मूल्यांमध्ये आणि विकासात संविधानाची भूमिका किती महत्त्वाची आहे, यावर मार्गदर्शन केले. या महत्त्वपूर्ण प्रसंगी उपसरपंच सुधाकर वडमिले, भुजंग साबळे, शिवराज महाके, केंद्रे मॅडम, गणेश कुंभार, त्रिमुक महाके, चंदर गंटे, प्रमेश्वर सुर्यवंशी यांच्यासह गावातील नागरिक आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमामुळे गावातील नागरिकांमध्ये संविधानाविषयी अधिक जागरूकता निर्माण झाली. सर्व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.


टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग



निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396


## संविधानाचे रक्षण म्हणजे निसर्गाने दिलेल्या गोष्टींचे रक्षण : डॉ. निशिकांत वारभुवन

**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय संविधानाचा ७५ वा वर्धापन दिन,परिवर्तन चॅरिटेबल ट्रस्ट लातूर, यांच्या वतीने आयोजित करण्यात आला. यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून संविधान एक ग्रंथ नव्हे तर जीवनशैली या विषयावरती ते बोलत होते. डॉ. वारभुवन पुढे म्हणाले की, संविधानातील कलम २१ नुसार प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याचा मूलभूत हक्क आहे. निसर्गाने दिलेल्या गोष्टीनचे हनन कोणीही करू शकत नाही, निसर्गदत्त गोष्टींचे रक्षण करण्यासाठीच बाबासाहेब आयुष्यभर सामाजिक न्यायाच्या बाजूने उभे राहिले. ज्या निसर्गदत्त गोष्टी आहेत त्या सर्वांना मिळाल्या पाहिजेत त्याची खात्री भारतीय संविधान प्रत्येक नागरिकाला देते. केवळ ॲट्रॉसिटी म्हणजे संविधान नाही, दुर्दैवाने हाच अर्थ बहुसंख्य लोक घेत असल्यामुळे त्यांची सांविधानिक साक्षरता वाढविण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून बाबसाहेबांचे स्थान अढळ आहे. सामाजिक न्यायाचा आणि व्यक्तीच्या प्रतिष्ठेचा आग्रह बाबासाहेबांनी धरला. याच मुल्यांची कृती राज्यघटनेत दिसून येते.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून प्रा. पंचशील डावकर उपस्थित होत्या. त्यांनी यावेळी संविधान एक ग्रंथ नव्हे तर एक जीवनशैली या विषयावर मांडणी करतांना बंधुत्वाच्या मूल्यांवरती प्रकाश टाकला, त्या पुढे म्हणाल्या की, आजच्या अस्थिर आणि असुरक्षित समाजात बंधुत्वाची नितांत आवश्यकता आहे. बंधुत्वाचे मुल्ये बाबासाहेबांनी फ्रेंच राज्यक्रांतीतून घेतले अशी सर्रास चर्चा केली जाते. पण बाबासाहेबांनी स्वतः हे सांगितेले आहे की, स्वातंत्र्य समता आणि बंधुत्वाची मुल्ये बाबासाहेबांनी त्यांचे गुरु तथागत बुध्दांकडून घेतली आहेत.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी भूषवले. यावेळी ते म्हणाले की, राज्यघटनेची अंमलबजावणी ही चुकीच्या लोकांच्या हाती आलेली आहे त्यामुळे लोकशाही मूल्यांची प्रत खालावून गेलेली आहे.




या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयंत कांबळे यांनी केले. यावेळी संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन प्रा. सुमित सातपुते यांनी केले. स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी विविध क्षेत्रात यशस्वी झालेल्या विद्यार्थी आणि व्यक्तींना परिवर्तन चेरिटेबल ट्रस्टच्या वतीने संविधानाची प्रत, सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. सन्मानार्थी डॉ. सदानंद कांबळे, प्रा. देवदत्त सावंत, मनोज सूर्यवंशी, प्रा. शिल्पा माकणीकर, प्राचार्य आम्रपाली सरवदे, शशांक भदरगे, प्रियंका रवींद्र हरबडे तसेच

कार्यक्रमाचे सुत्र संचालन विलास आल्टे यांनी केले तर आभार आम्रपाल बनसोडे यांनी मानले. या वेळी परिवर्तन चेरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष मिलींद कांबळे, राजाभाऊ उबाळे, अर्जुन कांबळे, सोपान डुमने, प्रशांत माकणीकर, अक्षय गायकवाड, श्रीकांत इंगळे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी विविध क्षेत्रातील तज्ञ, अभ्यासक, वाचक, हितचिंतक महिला भगिनी यांनी सक्रि. सहभाग घेतला.


Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६